# मेहता मराठी ग्रंथजगत

जून, २०२५
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष पंचविसावे
अंक सहावा



## साहित्य पुरस्कारासाठी आवाहन



# 'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'



'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'** देण्यास सुरुवात झाली. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात आली होती.

या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
**₹ ३०,०००/-**

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
**₹ २०,०००/-**

### पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१ ऑक्टोबर, २०२४ ते ३० सप्टेंबर, २०२५ दरम्यान प्रकाशित झालेली लेखकाची पहिली कादंबरी किंवा कथासंग्रह या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख : १ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत

पात्र इच्छुकांनी पुस्तकाची एक प्रत, संपूर्ण परिचय, संपूर्ण माहिती (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक) आणि फोटो आमच्या पत्त्यावर पाठवावे.

या पुरस्काराची घोषणा डिसेंबर, २०२५ मध्ये केली जाईल.
१२ जानेवारी, २०२६ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ जून २०२५ ◆ वर्ष पंचविसावे ◆ अंक सहावा

**संपादक**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
प्रतीक येतावडेकर

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाइन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*


— *अनुक्रमणिका* —


| | |
|---|---|
| **संपादकीय** | **४** |
| **पुरस्कार** | **९** |
| **श्रद्धांजली** | **११** |
| **विशेष उपक्रम** | **१२** |
| **पुस्तकाच्या पानांतून** | |
| द आर्ट ऑफ चूझिंग | १४ |
| महारुद्र | २६ |
| सोलापूर मार्शल लॉ १९३० | ३४ |
| दि न्यू बीजेपी | ४४ |
| मुंबई आफ्टर अयोध्या | ५४ |
| **दिनविशेष** | **६०** |



संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com



'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

# संपादकीय

## तेजोमय नादब्रह्म हे...

जून महिन्याच्या २१ तारखेला आंतरराष्ट्रीय स्तरावर ‘जागतिक संगीत दिन’ साजरा केला जातो. १९८२मध्ये पहिल्यांदा ही संकल्पना अमलात आणली गेली. पॅरिसमध्ये ‘संगीत दिन’ साजरा केला गेला. त्यानंतर जगभरातील १२० देशांमध्ये ‘संगीत दिन’ साजरा केला जाऊ लागला.

भारततही पुरातन काळापासून संगीत क्षेत्राची मोठी परंपरा आणि ख्याती आहे. मध्ययुगीन काळात राजेरजवाड्यांमध्ये संगीताला राजाश्रय देण्याची पद्धत होती. मध्ययुगीन काळापासून ते अगदी १९व्या शतकाच्या पूर्वार्धात कोल्हापूर संस्थानातही राजर्षी शाहू महाराजांनी संगीत कलेला राजाश्रय दिल्याची उदाहरणे पाहता येतील.

मुघल काळात सम्राट अकबराच्या दरबारात नवरत्ने होती. त्यातील एक म्हणजेच संगीतसम्राट तानसेन होय. भारतीय शास्त्रीय संगीतामध्ये तानसेन या गायकाचे नाव घेतल्याशिवाय पुढे जाता येणे अशक्य आहे. त्या काळात तानसेनने रचलेल्या बंदिशी आणि बांधलेले

नवे राग याची भुरळ समकालीन गायकांनाही आहे. याचा अनुभव कायमच येत असतो. राग मियाँ की तोडी, हा सकाळच्या प्रहरी गायचा राग असो वा उत्तर रात्रीच्या प्रहरात गायचा राग दरबारी कानडा असो, या शास्त्रीय रागांची भुरळ आजही जनमानसावर आहे.

तानसेनबद्दल एक आख्यायिका प्रसिद्ध आहे. पाऊस काळात जशी पर्जन्यवृष्टी होते तशाच प्रकारे पाऊस पाडण्याची ताकद तानसेनच्या सुरांमध्ये होती. 'राग मियाँ मल्हार' हा वर्षाकालीन राग आळवला तर निश्चित पाऊस बरसत असे. याच बरोबरीने राग दीपक या अनवट रागासंबंधीचीही आख्यायिका प्रसिद्ध आहे. तानसेनने हा राग आळवला की दिवे आपोआप प्रज्वलित व्हायचे. पूर्वीच्या काळात मनोरंजनाची साधने मर्यादित होती. त्या वेळेस संगीत मैफिली आणि संगीत याचाच आधार लोकांना घ्यावा लागत असे.

जसजसा काळ बदलत गेला तसतशा संगीत मैफिली कमी होत गेल्या. अखिल भारतीय पातळीवर ख्याती असणारे संगीत-समारंभ आणि संगीत-संमेलने यामुळे आजही शास्त्रीय, उपशास्त्रीय तसेच पाश्चात्त्य संगीत यांना व्यासपीठ उपलब्ध केलेले पाहायला मिळते. पंजाबात भरणारा हरिवल्लभ संगीत समारोह, राजस्थानातील तानसेन समारोह आणि महाराष्ट्रातील पुण्यात भरणारा सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सव ही त्यातील काही प्रमुख उदाहरणे होत.

महाराष्ट्रातही शास्त्रीय संगीताची मोठी परंपरा आहे. किराणा, जयपूर, अत्रौली, ग्वाल्हेर इत्यादी ख्यातकीर्त संगीत घराण्यांची तालीम घेतलेले अनेक गायक व गायिका गोवा, कर्नाटक, महाराष्ट्रातील होते आणि आजही आहेत. बालगंधर्व, अब्दुलकरीम खाँ, अल्लादियाँ खाँ, मोगूबाई कुर्डीकर, कुमार गंधर्व, भीमसेन जोशी, हिराबाई बडोदेकर, माणिक वर्मा इत्यादी. खरं पाहिलं तर ही यादी अजूनही मोठी होईल; मात्र वानगीदाखल त्यातील प्रातिनिधिक नावांचा उल्लेख केला आहे. या सर्व गायक-गायिकांनी महाराष्ट्रातील संगीतशौकीन कानसेनांना त्यांच्या गायकीने समृद्ध आणि श्रीमंत केले. तसेच मनमुराद आनंद दिला.

मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ग्रंथसूचीत संगीतविषयक अशी निवडक पुस्तके आहेत. रणजित देसाई यांची ‘अभोगी’ ही कादंबरी गायक कलावंताच्या कलेविषयीच्या प्रेमाचे, निष्ठेचे चित्रण करते. ‘हे बंध रेशमाचे’ या संगीत नाटकात संगीत कलेला जात-धर्म यांचा विधिनिषेध नसतो हे सूत्र वाचकांना एक वेगळाच संदेश देऊन जाते. त्याच सोबत ‘मंद्र’ ही डॉ. एस.एल.भैरप्पा यांची कादंबरी, भा.द.खेर यांची ‘गंधर्वगाथा’ ही बालगंधर्वांवरील कादंबरी, ‘मायकल जॅक्सन : एक जादू आणि बेधुंदी!’ ही मायकल जॅक्सनवरची कादंबरी, ‘अनाहत’ ही स्वाती चांदोरकर यांची कादंबरी, अशी पुस्तके संगीतविषयक आणि संगीताची माहिती देणारी या सदरातील आहेत.

आमच्या सर्व वाचकांना ‘जागतिक संगीत दिना’च्या शुभेच्छा!!

अखिल मेहता

# मेहता मराठी ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी
आजच वर्गणीदार व्हा.

आमच्या छपील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

***Available on***

amazonkindle | Google Play Books

**Find us on: facebook®**

https://www.facebook.com/mehtapublishinghouse

# मेहता पब्लिशिंग हाऊस

## टी बुक क्लब

BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किंमतीत मिळवा!

आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत
मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक


**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -

www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx




नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी **eBooks**
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर –
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि अँन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

ebook available on :

amazonkindle | Get it on Apple Books | Google Play Books

# पुरस्कार

## डॉ. सुनीलकुमार लवटे यांना म.सा.प.चा 'विशेष ग्रंथकार पुरस्कार'

पुणे : महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांच्याकडून दिला जाणारा 'विशेष ग्रंथकार पुरस्कार' यंदा आघाडीचे लेखक डॉ. सुनीलकुमार लवटे यांना प्राप्त झाला आहे. २६ मे, २०२५ रोजी पुणे येथील एस. एम. जोशी सोशलिस्ट फाउन्डेशन सभागृहात त्यांना 'आशा प्रभाकर संत पुरस्कार' प्रदान करण्यात आला. संपादन क्षेत्रातील योगदानासाठी त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे फेब्रुवारी २००६मध्ये प्रकाशित केलेल्या 'खाली जमीन वर आकाश' या आत्मकथनासही अनेकदा गौरवण्यात आले आहे; तसेच त्यांनी 'इन बिटवीन' – 'भारतीय साहित्यिक', 'समकालीन साहित्यिक' अशा पुस्तकांचीही निर्मिती केली आहे. अनाथांच्या संगोपन आणि पुनर्वसन कार्यासाठी झटणाऱ्या डॉ. सुनीलकुमार लवटे यांचं विशेष ग्रंथकार पुरस्कार मिळाल्याबद्दल मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे मन:पूर्वक अभिनंदन आणि त्यांना पुढील वाटचालीसाठी  हार्दिक शुभेच्छा!

## सदानंद कदम यांना 'म.सा.प.'चा 'वार्षिक ग्रंथ पुरस्कार'

पुणे : महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांच्याकडून दिला जाणारा 'वार्षिक ग्रंथ पुरस्कार' यंदा प्रसिद्ध लेखक सदानंद कदम यांना प्राप्त झाला. २६ मे, २०२५ रोजी एस. एम. जोशी सोशलिस्ट फाउन्डेशन सभागृहात त्यांना 'सागर/वसुधा शिरोळे पुरस्कृत ॲड. त्रिंबकराव शिरोळे पारितोषिक' हे त्यांच्या 'काळीजखुणा' या ललितसंग्रहासाठी प्रदान करण्यात आले. मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे 'सांगाती – स्मरणझुला एका जिप्सीचा' हे ख्यातनाम साहित्यिकांचे व्यक्तिचित्रण असलेले पुस्तक २०२१ साली प्रकाशित झालेले आहे. अशा विविधांगी लेखन करणाऱ्या सदानंद कदम यांचं मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे मन:पूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

## सु. ल. खुटवड यांना 'म.सा.प.'चा विशेष ग्रंथ पुरस्कार

पुणे : महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांकडून दिला जाणारा 'विशेष ग्रंथकार पुरस्कार' यंदा आघाडीचे विनोदी लेखक सु. ल. खुटवड यांना प्राप्त झाला आहे. २६ मे, २०२५रोजी एस. एम. जोशी सोशलिस्ट फाउन्डेशन सभागृह, गांजवे चौक, पुणे येथे 'सागर/वसुधा शिरोळे पुरस्कृत मालिनी शिरोळे पुरस्कार' या पुरस्काराने त्यांना पुरस्कृत करण्यात आले. मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे सकाळ पेपरमध्ये गाजलेल्या त्यांच्या 'पंचनामा' या सदराची पुस्तकरूपात निर्मिती करण्यात आली आहे. 'नस्ती पंचाईत', 'जनूभाऊ', 'कागदी घोडे', 'हास्याची लाट' आणि 'विनोदाचं गुऱ्हाळ' असे पंचनामाचे पाच भाग आहेत. सु. ल. खुटवड यांच्या प्रासंगिक आणि मार्मिक; पण विनोदी ढंगाने जाणाऱ्या लेखनाने वाचकांच्या मनाचा ताबा घेतला हे नक्की. सु. ल. खुटवड यांना पुढील वाटचालीसाठी मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे हार्दिक शुभेच्छा!

◆

# श्रद्धांजली

## प्रख्यात खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत विष्णू नारळीकर कालवश




पुणे : 'साधी राहणी, उच्च विचारसरणी' या विधानाप्रमाणे स्वत:चं आयुष्य संपन्न करत; पृथ्वीवासी असूनही अगदी सहज अवकाशभ्रमण करत जनमानसात प्रख्यात झालेले खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत विष्णू नारळीकर हे वयाच्या ८६व्या वर्षी खऱ्या अर्थाने अवकाशवासी झाले. खगोलशास्त्रज्ञ, विज्ञानलेखक आणि विज्ञानप्रसारक अशी ख्याती असलेल्या डॉ. नारळीकरांनी 'अंतराळातील भस्मासुर,' 'अंतराळ आणि विज्ञान' इ. विज्ञानमय पुस्तकांची निर्मितीही केली. भारताबरोबरच त्यांनी जागतिक पातळीवरही शास्त्रज्ञ म्हणून स्वत:चा एक वेगळा ठसा उमटवला. सर फ्रेड हॉएल यांच्यासह 'कन्फॉर्मल ग्रॅव्हिटी थिअरी'ची निर्मिती करून जगातील सर्व शास्त्रज्ञांचं लक्ष वेधून घेतलं. खगोलशास्त्रातील याच अमूल्य कामगिरीसाठी त्यांना 'पद्मभूषण' आणि 'पद्मविभूषण' या सन्मानांनी गौरवण्यात आलं होतं. 'आकाशाशी जडले नाते' असं म्हणत तारे-तारकांमध्ये रममाण होणाऱ्या डॉ. जयंत विष्णू नारळीकर यांना मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

◆

## विशेष उपक्रम

### या रे या, सारे या... भरपूर पुस्तके वाचू या..!

'फांदीवरची फुलपाखरे, आभाळात उडाली; स्वैर होऊ या त्यांच्यासंगे, धमाल सुट्टी आली' या बालचमूंच्या आवडत्या कवितेचे शब्द जरी प्रख्यात कवी प्रवीण दवणे यांचे असले; तरी लहानांबरोबर मोठेही याचा भरपूर आनंद घेत असतात. अस्थिर अशा या युगात लहानांची पुस्तकाशी नाळ जोडून ठेवणं ही काळाची गरज झाली आहे. पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे यांनी हीच गरज जाणली आणि त्यातूनच पुणे पुस्तक महोत्सव, राष्ट्रीय पुस्तक न्यास, पुणे महापालिका आणि संवाद पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने २२ ते २५ मे दरम्यान गणेश कला क्रीडा केंद्र, पुणे इथे 'पुणे बालपुस्तक जत्रा २०२५'चे आयोजन केले होते. ही 'बाल जत्रा'- मनोरंजक पुस्तके, कार्यशाळा, लेखकांशी गप्पा आणि बालसाहित्य लेखन स्पर्धा यांसारख्या विशेष कार्यक्रमांनी बहरलेली होती. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या दालनालाही बालचमूंची गर्दी होती ही नक्कीच अभिमानाची गोष्ट आहे. बालवाचकांनी स्वतःहून तिथल्या नानाविध उपक्रमांत सहभाग घेऊन उपक्रमाला उत्तम प्रतिसाद दिला आणि भरघोस पुस्तक खरेदीने ही




‘बालपुस्तक जत्रा’ संपन्न झाली, त्याबद्दल पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे यांचे अभिनंदन!

वाचक हो..! मे महिन्याच्या प्रारंभी ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’ने पाच ते दहा वर्षे वयोगटातील बालवाचकांसाठी आयोजित केलेल्या ‘गोष्टींची सुट्टी’ या उपक्रमातही बालवाचकांचा दांडगा उत्साह पाहायला मिळाला. २६ एप्रिल ते १७ मे या दरम्यान आठवड्याच्या प्रत्येक शनिवारी हा कार्यक्रम भरवण्यात आला. सुप्रसिद्ध बालसाहित्यिकांचे गोष्टीरूप मार्गदर्शन आणि मजा-मस्ती यांनी भरलेला प्रत्येक शनिवार अविस्मरणीय होत गेला. राजीव तांबे, वृषाली पटवर्धन, लीना सोहोनी आणि मंजूषा आमडेकर यांनी गोष्टीरूपी संवाद साधत मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना देण्याचाही प्रयत्न केला. कधी मुलांनी गोष्ट ऐकता-ऐकता प्रश्न विचारले; तर कधी गोष्टीनंतर परत पालकांना तीच गोष्ट सांगत ‘मला गोष्ट कळली आहे’ हे दाखवून दिले. कधी गोष्टीनंतर मुलांनी गोष्टीतील पक्षी-प्राण्याचे त्यांच्यापरीने चित्रही काढले; तर कधी कार्यक्रमानंतर हट्टाने पुस्तक खरेदीही केली. असा हा उपक्रम मुलांना खऱ्या अर्थाने सुट्टीसारखा वाटला, यासाठी आयोजकांचे अभिनंदन.

‘या रे या, सारे या... भरपूर पुस्तके वाचू या...’ असे म्हणत बालमनाच्या विचारांची व्यापकता वाढवण्याचे, किंबहुना तशी दृष्टी देण्याचे महत्त्वपूर्ण काम प्रत्येक बालसाहित्यिकाने केले यासाठी त्यांचे आभार आणि या अधूनमधून निर्माण होणाऱ्या बिनभिंतीच्या शाळेमध्ये डोकावण्यासाठी बालचमूंचे कायम स्वागत. सर्व बालवाचकांना नवीन शैक्षणिक वर्षातील अभ्यासासाठी व अभ्यासेतर वाचनासाठी भरपूर शुभेच्छा...!

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# द आर्ट ऑफ चूझिंग

**शीना अयंगार** अनुवाद : **सुभाष जोशी**

*निवडीची कला बाणवा अंगी... मग होईल जीवनाची पूर्ती*

### हाक

### १. तगून राहण्याची कला

अशा प्रसंगी तुम्ही काय कराल? एखाद्या लहानशा रबरी नावेत बसलेले असताना भर समुद्रात अडकून पडलात, किंवा पाय मोडलेला असताना, एखाद्या पर्वतावर असलात

२ ५

किंवा अशा प्रसंगी तुम्ही काय कराल, असं तुम्हाला वाटतं? पाण्यामध्ये जलसमाधी न मिळता, तुम्ही किती वेळ पोहत राहू शकाल? तुमचं आशावादी मन तुम्हाला किती वेळ साथ देईल? आपण हे असले प्रश्न विचारतो - आणि तेही रात्रीच्या भोजनाच्यावेळी, एखाद्या पार्टीत चाललेल्या गप्पांमध्ये किंवा रविवारी दुपारी रिकामपणाच्या गप्पा मारताना - ते या प्रसंगातून कसं सहीसलामत बाहेर पडण्याचे मार्ग विचारायला नाही, तर आपल्या तग धरून राहण्याच्या असीमित मर्यादांमुळे आपण भारावून गेलेलो असतो म्हणून कुठलीही पूर्वतयारी नसताना किंवा पूर्वानुभव नसताना, आपण असल्या खडतर प्रसंगांना तोंड देण्याची जी क्षमता बाळगतो, त्याचं आपण मनोमन कौतुकच करत असतो. आपल्यापैकी किती जण, आणि हे मला खरंच विचारावसं वाटतं, असल्या संकटात सापडल्यावर, ती गोष्ट सांगायला जिवंत राहतील?

आता या स्टीव्हन कॅलाहानचंच उदाहरण घ्या. १९८२साली, ५ फेब्रुवारीला कॅनरी आयलंडपासून सुमारे ८०० मैलांवर असताना त्याची *‘नेपोलियन सोलो ’* नावाची लहानशी नौका, वादळात उलटली. तेव्हा तीस वर्षांचा असलेला कॅलाहान, हवेने फुगवलेल्या त्या गळक्या लहानशा रबरी नावेत एकटाच होता आणि त्याच्यापाशी फारशी संसाधनंही नव्हती. पावसाचं पाणी साठवून तो ते पिण्यासाठी वापरत होता. मासे मारण्यासाठी त्यांनी एक टोकदार तीर बनवला होता. समुद्रात सापडणारे ‘बर्न्याकल’ नावाचे जलचर प्राणी खाऊन तो पोटाची खळगी भरत होता. त्या ‘बर्न्याकल’चे उरलेले अवशेष खायला पक्ष्यांच्या झुंडी धाड घालत होत्या. अशा अवस्थेत मन खचून जाऊ नये म्हणून तो आपली अशक्त प्रकृती साथ देईल, तेव्हा आपले अनुभव लिहून काढायचा आणि योगाभ्यास करायचा. इतर काही करण्यासारखं हातांत नसल्यामुळे, तो वाट बघत बसला होता आणि दरम्यानच्या काळात, त्याची नाव पश्चिमेकडे भरकटत चालली होती. २१ एप्रिलला, म्हणजे शाहत्तर दिवसांनंतर, ‘ग्वाडेलोप’जवळ त्याची नाव कोणीतरी पाहिली. समुद्रावर तीस दिवसांपेक्षा जास्त काळ तग धरलेले, आजही ते एकमेव इसम आहेत.

नौकानयनात निपुण असलेल्या कॅलाहानला समुद्रावर प्रवास करण्याचा भरपूर अनुभव होता आणि त्या शाहत्तर दिवसांच्या काळात तो त्याला

निश्चितच उपयोगी पडला; पण तो जिवंत राहिला, याला हेच एकमेव कारण होतं का? *भरकटलेला: शाहत्तर दिवस समुद्रावर हरवलेला,* या नंतर लगेचच लिहिलेल्या पुस्तकात, त्यांनी आपले अनुभव मांडलेले आहेत.

> आता *'सोलो'* चे फक्त अवशेष उरलेले आहेत. माझ्या जवळची संसाधने सुरक्षित आहेत आणि महत्त्वाच्या शारीरिक क्रिया काम करत आहेत. माझ्या दैनंदिन कार्यक्रमाची अग्रक्रमाची घडी आता नीट बसलेली आहे. अग्रक्रम हाच, की स्वत:ची चिडचिड होऊ द्यायची नाही. भीती, वेदना आणि मनातल्या बंडखोर विचारांवर मी बऱ्यापैकी नियंत्रण मिळवलेलं आहे. या विश्वासघातकी पाण्यातल्या या छोट्याशा नौकेचा मी कॅप्टन आहे. *'सोलो'* गमावल्यानंतर मनात उठलेल्या संभ्रमाच्या वादळातून मी माझी सुटका करून घेतलेली आहे आणि माझ्या खाण्याच्या आणि पिण्याच्या पाण्याचा, मी प्रश्न सोडवलेला आहे. आता मी मरणाच्या दारापासून दूर गेल्यासारखं मला वाटत आहे. आता माझ्यापुढे दोनच पर्याय आहेत : एका नवीन आयुष्याकडे ही नौका वल्हवत न्यायची, का स्वत:चं मरण, 'याची देही याची डोळा पाहात बसायचं?' मी जमेल तितके हात-पाय मारायचे ठरवले.

कॅलाहानने त्या परिस्थितीला चौकटबद्ध केलं-अर्थातच ती फार बिकट होती - आणि त्याचं रूपांतर निवड करण्याच्या पर्यायात केलं. त्याच्या खाली सर्व दिशांनी अथांग सागर पसरलेला होता. त्याला फक्त निळा पृष्ठभाग दिसत होता आणि खाली अनेक संकटं संधीची वाट पाहात होती. हे जरी असलं, तरी लाटांच्या खळखळण्यात आणि शीळ घालत येणाऱ्या वाऱ्याच्या आवाजात, त्याला मृत्युदंड ठोठावल्याचा आवाज ऐकू आला नाही. त्याला उलट एक विचारलेला प्रश्न ऐकू आला, तुला जागयचं आहे ना? तो प्रश्न ऐकण्याची क्षमता आणि त्याचं होकारात्मक उत्तर-परिस्थितीने हिरावून घेललेली संधी, स्वत:साठी त्याने उपलब्ध करून दिली-हे बहुधा त्याच्या तग धरून राहण्याचं कारण असू शकतं. तू काय करशील? असा प्रश्न जर कोणी तुम्हाला पुढच्यावेळी विचारलाच, तर कॅलाहानचा आदर्श समोर ठेवून बेधडक उत्तर द्या, मी निवड करेन.

आता या, ज्यो सिम्पसनचं उदाहरण बघा. असाच एक परिस्थितीशी सामना करून विजय मिळवलेला माणूस. पेरुव्हियन ॲन्डेजमध्ये, बर्फाच्छादित

शिखरावरून उतरताना, हा जवळपास मेल्यातच जमा होता. खाली उतरताना कोसळल्यामुळे, त्याचा पाय मोडला. त्याला मिनतवारीने एखादं पाऊल टाकता येत होतं. त्याच्या साथीदारांनी, सिमॉन येल्सने, त्याला दोरांच्या साह्याने खाली सुरक्षित जागी उतरवण्याचा प्रयत्न केला. खाली गेलेला सिम्पसन जेव्हा दिसतही नव्हता किंवा त्याचा आवाजही ऐकू येत नव्हता, तेव्हा तो सुरक्षित जागी पोहोचला आहे, असं समजून त्यांनी त्याला एका कड्याच्या पृष्ठभागावर उतरवलं. सिम्पसन आता डगमगायला लागला, कारण त्याला स्थिर राहणं अशक्य होतं आणि वरती चढून जाणं त्याहूनही अवघड होतं. आता येट्सला सिम्पसनच्या वजनाचा संपूर्ण भार पेलायचा होता; कधीतरी तो भार त्याला असह्य होणारच होता आणि तसं केलं तर ते दोघंही खाली खोल दरीत कोसळण्याची शक्यता होती. शेवटी दुसरा काहीच पर्याय नसल्यामुळे, मनावर दगड ठेवून येट्सनी दोर कापला. आपण आपल्या मित्राला, मृत्युदंडच देत आहोत, असं त्याला वाटलं. प्रत्यक्षात जे घडलं, ते फारच विलक्षण होतं. सिम्पसन एका घळीमधे सुखरूप पोहचला होता. पुढच्या काही दिवसांत तो रांगत रांगत, पाच मैलांवर असलेल्या आपल्या पायथ्याच्या तळावर पोहोचला, तेव्हा येट्स तिथून निघण्याच्या बेतात होता. *'टचिंग द व्हाइड'* या आपल्या पुस्तकात त्याने या प्रसंगाचं वर्णन केलेलं आहे. सिम्पसन लिहितो-

> खाली जाण्याची कल्पनाच मला सहन होत नव्हती. खाली नक्की काय असेल, याची मला सूतराम कल्पना नव्हती. मला फक्त दोनच गोष्टींची खात्री वाटत होती : सिम्पसन आता गेला आहे आणि कधीच परतणार नाही. म्हणजे मी त्या बर्फाच्या शिखरावर पडून राहिलो असतो, तर तिथेच संपलो असतो. वरती जाऊन सुटका करण्याचा काहीच मार्ग नव्हता आणि खाली गेलो तर सगळंच काम पटकन संपण्यासाठीचं ते आमंत्रण ठरलं असतं. मला एकदा मोह पडला, पण त्या विमनस्क अवस्थेतही, माझ्यापाशी आत्महत्या करण्याचं धाडस नव्हतं. थंडी आणि दमछाक झाल्यामुळे मला संपायला बराच काळ लोटेल, हे मला जाणवत होतं. पण निष्क्रीयपणे एकटं बसण्याच्या कल्पनेनं मी पार वेडा झालो होतो. त्यामुळेच मला ह्या पर्यायाची निवड करावी लागली : एखादा मार्ग सापडेपर्यंत खाली घरंगळत जायचं किंवा हे करताना

मरायचं. शेवटी ते मरण इथे येऊन मला गाठण्यापेक्षा, मीच त्याला जाऊन भेटतो. आता माघार घ्यायची नाही, असं मी ठरवलं असलं, तरी माझं मन मात्र मला, 'थांब थांब...' असं ओरडून आक्रोश करत सांगत होतं.

कॅलाहान, किंवा सिंप्सनसारख्या विचारवंतांसाठी, तग धरणे, हा त्यांच्या निवडीचा भाग होता आणि खास करून सिंप्सनच्या बाबतीत तर एक संधी हा पर्याय नसून, अत्यावश्यक भाग होता. तुम्ही एकवेळ संधी दवडू शकाल; पण अत्यावश्यक गोष्टही केली पाहिजे.

आपल्यापैकी अनेकांना अशा अत्यावश्यक गोष्टींना तोंड द्यायला लागण्याची वेळ येणार नाही (अशी आशा करू या) पण आपल्या दैनंदिन जीवनात, असे महत्त्वाचे निर्णय घेण्याची आपल्यावर वेळ येतेच. आपण यावर काही निर्णय घ्यावा का, संथपणे काय होत आहे, ते बघत बसावं? जे काय नियतीने वाढून ठेवलेलं आहे, ते निमूटपणे स्वीकारून आपली उद्दिष्ट्ये गाठण्याचा प्रयत्न करत बसायचं? आपल्या जीवनाचा आपण अनेक पैलूंनी विचार करतो : वय, महत्त्वाच्या घटना, उपलब्धी किंवा आपण आत्तापर्यंत घेतलेल्या निर्णयांमुळे, आपण जे काही, जसे काही आज आहोत, या निकषांवरही आपण त्याचं मोजमाप करू शकतो. या भिंगातून जेव्हा आपण आपल्या आयुष्याकडे बघतो, तेव्हा निवड करण्याचं स्वातंत्र्य ही एक जबरदस्त प्रेरणा आहे, हेच आपल्या लक्षात येतं आणि आपण आपलं आयुष्य कसं व्यतीत करायचं, ते आपल्याला समजतं. पण ह्या प्रेरणेचं उगमस्थान नक्की कुठे आहे आणि त्याचा आपण कसा चांगला फायदा करून घेऊ शकतो?

## २. माणूस आणि उंदीर

१९५७ साली कर्ट रिक्टर, हॉपकिन्स स्कूल ऑफ मेडिसीन मधील एक विपुल मनोविज्ञान संशोधक, यांनी एक प्रयोग केला होता आणि तो तुम्हाला नक्कीच धक्कादायक वाटेल. त्यांनी पाण्याच्या तापमानाचा सहनशक्तीवर होणारा परिणाम तपासून पाहायचं ठरवलं. रिक्टर आणि त्याच्या सहकाऱ्यांनी असंख्य उंदीर एकेका काचेच्या पात्रात ठेवले, आणि त्यांत पाणी भरलं. काचेच्या पात्राच्या कडा उंच आणि गुळगुळीत होत्या, त्यामुळे आतील

उंदरांना पोहणे-किंवा मरणे हेच दोन पर्याय उरले होते. रिक्टरने त्या काचपात्रांच्यावर धमाका उडवून खळबळ माजेल, अशी व्यवस्था केली होती आणि अर्थातच, जीवाच्या आकांताने वरती पोहणाऱ्या उंदरांना, पाण्यावर पोहत राहणं शक्य होत नव्हतं. मग त्याने प्रत्येक उंदीर, ज्याला अन्न, विश्रांती आणि सुटकेची कसलीही संधी नसताना, ते बुडण्याच्या आधी किती वेळ पोहत होते, याचा अभ्यास केला.

एकाच क्षमतेचे उंदीर, पाण्याचं तापमान एकसारखं असतानाही पोहत राहिले, पण त्यांच्या पोहण्याच्या वेळेत फार तफावत होती. काही उंदीर सुमारे साठ तास पोहत आपला जीव वाचवण्याचा प्रयत्न करत असताना, काही उंदीर लगेचच पाण्यात बुडाले. म्हणजेच काही उंदरांनी पंधरा मिनिटं पोहल्यावर हार मान्य केली आणि बुडाले, तर बाकीच्यांनी आपल्या शारीरिक क्षमतेचा पूर्ण वापर करत, जमेल तितके पोहायचे ठरवले. आता जे उंदीर या अशक्यप्राय अवस्थेत पोहचत राहिले, त्यांना आपण असं केल्याने जिवंत राहण्याची शक्यता वाटत होती का? या विचारांनी ते संशोधक बुचकळ्यात पडले. म्हणजे उंदरांनाही वेगवेगळ्या स्तरांचे दृढविश्वास असतात का? पण प्रत्येक उंदराला या प्रसंगातून बाहेर पडून वाचायची इच्छा तर होतीच, मग त्यांच्या कामगिरीतील या तफावतीचा दुसरा अर्थ कसा काय लावायचा? कदाचित जे उंदीर जास्त वेळ चिकाटीने पोहत राहिले,त्यांना या भयानक प्रसंगातून सुटून जाऊ, असं वाटत राहिलं असावं.

आता या प्रयोगाचा दुसरा अध्याय सुरू झाला होता. आता त्या संशोधकांनी त्यांना पाण्यात टाकल्यावर ठराविक वेळेने बाहेर काढून सुरक्षित जागी ठेवलं आणि विश्रांती घेऊ दिली. हा प्रकार अनेकवेळा केल्यानंतर, मग त्या उंदरांना मागच्याप्रमाणे कित्येक मिनिटं काचेच्या पात्रात ठेवून वरती हवेचे झोत मारले. मग काही वेळांतच त्यांना बाहेर काढून, त्यांना त्यांच्या पिंजऱ्यात ठेवून आराम करू दिला. हे त्यांनी अनेकवेळा केलं आणि शेवटी, मघाशी सांगितलेल्या, 'पोहत रहा किंवा मरा,' या परीक्षणासाठी काचेच्या पात्रात ठेवलं. आश्चर्य म्हणजे, या वेळी एकाही उंदराने कच खाल्ला नाही आणि ते सगळे साठ तासांहून अधिककाळ पोहल्यानंतर दमछाक होऊन, एक-एक करून बुडाले.

आता उंदरांनाही काही भरवसा वाटतो, या कल्पनेने आपण जरा

अस्वस्थ होतो. पण आपल्याला बंधक बनवणाऱ्यांपासून आपण मुक्त होऊ शकतो आणि ह्या हवेच्या झोतामधल्या पाण्यापासून वाचू शकतो, याची खात्री पटल्यामुळे आपण अशा अप्रिय प्रसंगात तग धरू शकतो; इतकंच नाही तर मुक्तही होऊ शकतो, असा त्यांना विश्वास वाटायला लागला असावा. या प्रयोगामुळे, आपल्या भवितव्यावर आपलं काही नियंत्रण आहे आणि अशा प्रसंगांतून वाचण्याच्याही संधी अगदी जवळपास असतातच, असा त्यांना विश्वास वाटायला लागला असावा. या प्रयोगातले उंदीर आणि मगाशी सांगितलेले कॅलाहान आणि सिम्पसन, यांनी सारखाच विचार केला असला पाहिजे. तेव्हा या उंदरांनी आपल्यासाठी मार्ग निवडला होता, असं आपण म्हणू शकतो का? त्यांनी जगण्याचा निर्धार केला होता का? किमानपक्षी  जो पर्यंत आपलं शरीर साथ देत राहील, तो पर्यंत तरी?

जेव्हा अशा चिकाटीने दाखवलेल्या वृत्तीकडे दुर्लक्ष होतं, तेव्हा मनस्ताप होतो आणि एखाद्याला वाचवल्याच्या गोष्टीला दाद मिळत नाही, तेव्हा हृदय पिळवटते. १९६५साली, 'कॉर्नवेल युनिव्हर्सिटी'मधील मानसशास्त्रज्ञ मार्टीन सेलिग्मन या मानसशास्त्रज्ञाने क्रमश: अनेक प्रयोग केले आणि त्यामुळे आपल्या नियंत्रणाबाबतच्या अनेक समजूतींत बदल झाला. त्यांनी मंग्रल-मिश्रजातीच्या कुत्र्यावर-हे आकाराने बीगेल्स किंवा वेल्श कॉर्गीजसारखेच असतात-प्रयोग केले. त्यांनी एका मागून एक कुत्र्यांना एका पांढऱ्या चौकोनी पेट्यांमध्ये ठेवले. प्रत्येक कुत्र्याला कापडाचं अस्तर असलेल्या रबराच्या पट्ट्यांनी अशा प्रकारे जखडून लटकत ठेवलं होतं, की त्याच्या डोक्याच्या दोन्ही बाजूंच्या पट्ट्यांमुळे, त्यांना फक्त समोरचंच दिसत असे. त्यांच्या मानेखाली आधारासाठी उशी ठेवली होती. प्रत्येक कुत्र्याच्या समोरच्या पेटीत अशाच अवस्थेत असलेला एक कुत्रा, त्याचा जोडीदार होता.

प्रयोगाच्या दरम्यान समोरासमोरच्या दोघाही कुत्र्यांना, अपाय न करणारे, पण वेदना होतील इतपत इलेक्ट्रिकल शॉक दिले जायचे. पण या दोन्ही पेट्यांची रचना वेगवेगळी होती : एका पेटीतल्या कुत्र्याने पेटीच्या कडेला डोकं टेकवलं, की ते शॉक बंद व्हायचे, तर दुसऱ्या पेटीतील कुत्र्याने कितीही प्रयत्न केला तरी ते शक्य होत नव्हतं. दोघांनाही एकाच वेळेला शॉक दिला जायचा आणि दुसऱ्या पेटीतील कुत्र्याने, पेटीच्या कडेला डोकं लावून तो बंद केला, की दोघांचाही थांबण्यात यायचा. म्हणजे दोघाही

कुत्र्यांना सारख्याच प्रमाणात शॉक दिला जात असला, तरी एकाला तो सहन व्हायचा, तर दुसऱ्याला तो असह्य व्हायचा. ज्या कुत्र्याला शॉक बंद करता येत नसे, ते भेदरुन गेले आणि विव्हळायला लागले. ते पार खचून गेल्यासारखे वाटायला लागले आणि त्याला काळजीने घेरलं होतं. नंतर जरी शॉक दिलेला नसला, तरी त्यांच्या वागण्यात काही फरक पडला नाही. ज्या कुत्र्याला हे शॉक बंद करण्याची मुभा होती, ते थोडीशी चिडचिड करायचे, पण त्यांना आता वेदनांचा अंदाज आला होता आणि पेटीच्या कडेला डोकं लावून, तो ते टाळू शकत होते.

या प्रयोगाच्या दुसऱ्या भागात, या कुत्र्यांच्या जोडगोळीला एका वेगळ्या परिस्थितीला समोरं जायचं होतं. आधीच्या प्रयोगातल्या एका कुत्र्याला इलेक्ट्रिक शॉक कसा टाळायचा, ते माहीत होतं, तर दुसऱ्याला फक्त तो सहन करत बसणं इतकंच माहीत होतं. आता त्यांना एका मोठ्या काळ्या पेटीत ठेवण्यात आलं. मानेपर्यंत येईल इतक्या उंचीच्या दुभाजकाने, या पेटीचे मधोमध दोन भाग केले होते. दोन्ही कुत्रे एकाच विभागात ठेवण्यात आले आणि त्याच्या पत्र्याच्या तळभागाला, ठराविक अंतराने इलेक्ट्रिकचे शॉक दिले गेले. अर्थातच दुसऱ्या भागाला असे शॉक दिले जात नव्हते. मधल्या दुभाजकावरून त्या कुत्र्यांना सहज उडी मारून पलीकडे जाता आलं असतं. आधीच्या प्रयोगात, ज्या कुत्र्याला शॉक कसा टाळायचा याचं ज्ञान होतं, त्याला या शॉकपासून कसा बचाव करायचा याचं ज्ञान असल्यामुळे, त्याने पटकन पलीकडे उडी मारली; पण ज्या कुत्र्यांना मागच्या प्रयोगात ही संधी मिळाली नव्हती, त्यातली दोन-तृतीयांश कुत्री पलीकडे उडी न मारता असाह्यपणे तो शॉक सहन करत, विव्हळत खालीच बसून राहिली. शॉक बसतच राहिला आणि कुत्रे केकाटत खालीच बसून राहिले, पण सुटकेसाठी काहीच प्रयत्न केले नाहीत. इतर कुत्री त्यांच्या देखत पलीकडे उड्या मारून जात असतानाही, त्यांनी कसलीच हालचाल केली नाही. इतकंच नाही तर, यांतून सुटका होते, हे त्यांना दाखवून देण्यासाठी, त्यांना ओढून पलीकडे नेलं तरी ते वेदना सहन करीतच आपल्या जागी बसून राहिले. त्यांच्या दृष्टीने, दुभाजकाच्या बाजूला असलेला वेदनामुक्तीचा मार्ग - जो सहज आवाक्यात होता-हा अदृष्य होता. आपण जेव्हा निवड करण्याच्या संदर्भात बोलतो, तेव्हा आपल्याला स्वत:वरचं आणि परिस्थितीवरचं नियंत्रण अभिप्रेत असतं. निवड

करता येण्यासाठी प्रथम नियंत्रण ठेवता येईल का, ते पाहाणं आवश्यक ठरतं. सतत दमछाक होत असताना आणि सुटकेचा काहीही मार्ग समोर दिसत नसताना, ते उंदीर पोहतच राहिले, कारण त्यांनी स्वातंत्र्याची चव एकदा चाखली होती आणि प्रचंड धडपड केल्यामुळेच ती त्यांना चाखता आली होती, हे त्यांच्या लक्षात होतं. पण कुत्र्यांच्या बाबतीत मात्र, त्यांना वेदनांपासून कसा बचाव करायचा याचं ज्ञान नसल्यामुळे, हे सहन करतच बसायचं, अशी त्यांची मनोवृत्ती झाली होती. नंतरच्या प्रयोगात त्यांना सुटकेचा मार्ग दाखवला, तरी ते त्याची कल्पनाच करू शकले नाहीत. थोडक्यात सांगायचं, तर ते पार असह्य झाल्यामुळे, खचून गेले होते. याचाच अर्थ, त्या प्राण्यांना सुटकेच्या संधी किती होत्या, यापेक्षा, त्या किती आहेत असं त्यांना वाटत होतं, हे फार महत्त्वाचं होतं. उंदरांच्या प्रयोगासाठी योजलेल्या प्रयोगामध्ये त्यांना जीव गमवावा लागला होता, पण त्यांनी जी दुसऱ्या प्रयोगात चिकाटी दाखवली, ती जर खऱ्याखुऱ्या जगातील परिस्थितीत दाखवली असती, तर कॅलाहान किंवा सिंप्सनप्रमाणे त्यांचाही जीव वाचला असता.

## ३. मनातील निवड

आपण जेव्हा आरशात बघतो, तेव्हा आपल्याला निवड करण्यासाठी मदत करणारी काही *संयंत्र* दिसतात. आपलं नाक, डोळे, कान आणि तोंड आजूबाजूच्या परिस्थितीचा अभ्यास करून काही माहिती मिळवतात आणि त्या माहितीवर कृती करण्यासाठी आपण आपल्या हातापायांचा उपयोग करतो. भूक आणि तृप्ती, सुरक्षितता आणि असुरक्षितता, इतकंच काय जीवन आणि मृत्युसारख्या प्रसंगांतूनही मार्ग काढायला, आपण या इंद्रियांनी मिळवलेल्या माहितीवरच अवलंबून असतो. तरी सुद्धा आपण निवड करताना फक्त या इंद्रियांच्या माहितीवरच विसंबून नसतो. डॉक्टरने त्यांची रबरी हातोडी जर गुडघ्यावर योग्यजागी मारली तर आपला पाय हालतो, पण या प्रतिक्षिप्त क्रियेला आपण काही 'निवड' असं म्हणणार नाही. 'सुयोग्य निवड' करण्यासाठी, आपण आपल्याला उपलब्ध असलेल्या सगळ्या मतांचं तुलनात्मक विश्लेषण करून, त्यातला योग्य पर्याय निवडला पाहिजे, आणि हे करताना शरीराइतकंच बुद्धिलाही महत्त्व दिलं पाहीजे.

फंक्शनल मॅग्नेटिक रेझोनान्स इमेजिंग (FMRI) या अत्याधुनिक

यंत्राच्या साहाय्याने, आपण निवड करत असताना आपल्या मेंदूचा नेमका कुठला भाग कार्यरत असतो, हे समजते : त्याचं नाव आहे, 'कॉर्टिकोस्ट्रिएटल नेटवर्क.' त्याचा पहिला प्रमुख विभाग, 'स्ट्रायटम' हा मध्य भागातल्या मेंदूत आतवर असतो. पक्षी, सरपटणारे प्राणी आणि सस्तन प्राणी, या सर्वांत तो आढळतो आणि त्याचा आकार आणि कार्य जवळपास एकसारखे असते. मेंदूतल्या 'बेसल गांग्लिया' नावाच्या एका विभागाचा तो एक भाग असतो. मेंदूकडे येणारी लहान आणि मोठी माहिती जोडणाऱ्या स्वीचबोर्डचं काम हा विभाग करतो. मेंदूतील इतर विभागांकडून आलेल्या माहितीचं विश्लेषण करून, त्याच्यानुसार काय कार्यवाही करायची, ते 'स्ट्रायटम' ठरवतो आणि आपल्या निवड करण्याच्या कामासाठी हे फारच उपयुक्त ठरतं. अर्थातच अशी कार्यवाही ठरवताना पूर्वानुभवाचंही विश्लेषण केलं जातं. म्हणजे साखर चांगली आणि दाताचं रुटकॅनल-वाईट, असा आपल्याला इशारा मिळू शकतो. थोडक्यात म्हणजे, आपल्याला जे करावसं वाटतं, त्याला हा मेंदूकडून होकार भरतो.

पण साखर चांगली असते आणि रुटकॅनल वाईट असते, याचं फक्त ज्ञान असून भागत नाही आणि त्या आधारावर रास्त निवडही करता येत नाही. आपण हाही संदर्भ लक्षात ठेवला पाहिजे, की काही विशिष्ट परिस्थितीत, प्रमाणाबाहेर साखर खाल्ली, तर रुटकॅनल करण्याची पाळी येते. पूर्वानुभवावर असा निर्णय घेण्याच्या कामात, 'कॉर्टिकोस्ट्रिएटल नेटवर्क'चा नेटवर्क'चा दुसरा अर्धा भाग, प्रीफ्रंटल कोर्टेक्स, मदत करतो. आपल्या कपाळाच्या मागे असलेला, प्रीफ्रंटल कॉर्टेक्स, हे मेंदूच्या नियंत्रण कक्षाचं काम करतं. आपल्या सर्व शरीराकडून आणि स्ट्रायटमकडून येणारे सर्व संदेश तो गोळा करतो आणि त्या संदेशांचं विश्लेषण करून, त्या प्रसंगात नक्की काय कार्यवाही करायची, हे ठरवून, ती अंमलात आणयचं काम हा विभाग करतो. नजीकच्या आणि भविष्यकाळात होऊ शकणाऱ्या संभाव्य परिणामांचा विचार करून, निर्णय घेण्याची महत्त्वाची जबाबदारी, या विभागाकडे असते. आगामी काळात आपल्याला हानिकारक ठरू शकेल, असा निर्णय घेण्याच्या मोहापासून परावृत्त करण्याचं कामही हा विभाग करतो.

आपण सहजगत्या एखादी कृती करण्याची निवड करतो, त्या निर्णयाचं मूल्यमापन, प्रीफ्रंटल कॉर्टेक्स किती झालेला आहे, यावर अवलंबून असतं.

मानवात आणि प्राण्यांत आढळण्याऱ्या या प्रीफ्रंटल कॉर्टेक्सचा आकार भिन्न असतो. मानवाच्या मेंदूत, या विभागांनी व्यापलेली जागा, ही टक्केवारीने जास्त असते आणि म्हणूनच आपण कुठलाही निर्णय, अंत:प्रेरणेने, घाईघाईने न घेता, समंजसपणे घेऊ शकतो. तारुण्यावस्थेपर्यंत, प्रीफ्रंटल कॉर्टेक्स विकसित होतच असतो आणि म्हणूनच वाढत्या वयाबरोबर आपली निर्णयक्षमता वाढतच राहाते. बालवयात मुलांच्या शारीरिक कार्यासंबंधीच्या जाणिवांचा विकास होत असतो, नंतर वस्तूनिष्ठ विचार करण्याची क्षमता तारुण्यात पदार्पण करताना विकसित होते. प्रीफ्रंटल कॉर्टेक्स विकास आणि क्षमता सुमारे पंचवीस ते सव्वीस वर्षांपर्यंत होतच असते. लहान मुलांना, मोठ्या लोकांपेक्षा काल्पनिक आणि गूढ गोष्टी समजायला अवघड जाते. लहान मुलं आणि तारुण्यात प्रवेश केलेली मंडळी, ही आवेशाने निर्णय घेताना आढळतात, ते याच कारणामुळे.

आपल्या सभोवतालच्या परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी, निवड करण्याची क्षमता हाती असणं, हे एक प्रभावी साधन आहे. मानव जातीने या धरतीवर प्रभुत्व मिळवलेलं आहे, यात शंकाच नाही. आपण जन्मत:च जरी निवड करण्याचं साधन घेऊन आलेलो असलो तरी ती करण्याची आपली इच्छा असते, हेही तितकंच महत्त्वाचं आहे. उदाहरणार्थ, आपल्याला एखादी उपलब्धी जर नकळत झाली आणि तितकीच उपलब्धी, आपण केलेल्या निवडीमुळे झाली, तर 'स्ट्रायटम'मधले न्यूरॉन्स निवड करून झालेल्या उपलब्धीला जास्त प्रतिसाद देतात, असं आढळून आलं आहे. माशांनी पोहायलाच हवे आणि पक्ष्यांनी उडायलाच हवे, अशा अर्थाचं एक गाणं आहे, तसेच माणसाने निवड करायलाच हवी, असंही आपल्याला म्हणता येईल.

निवड करण्याची इच्छा इतकी नैसर्गिक असते, की काही वेळेस आपण ती व्यक्त करायच्या आधीच त्यावर कृती करायला लागतो. चार महिन्यांच्या लहान बालकांच्या मानसशास्त्राचा संशोधकांनी अभ्यास केला, तेव्हा त्यांनी त्याच्या हाताला एक दोरी बांधून, ती त्यांनी ओढल्यावर एखादं सुरेल संगीत वाजण्याची व्यवस्था केली. नंतर संशोधकांनी ती दोरी काढली आणि तेच संगीत, ते ठराविक अंतराने वाजवायला लागले. पण ती बालके आता चिडली आणि उदास झाली. इथे प्रश्न केवळ संगीत ऐकण्याचा


नव्हता, तर ते त्यांच्या नियंत्रणाने ऐकता आलं पाहिजे, असं त्यांना वाटत होतं.

उपलब्ध असलेल्या सर्व पर्यायांमधून, सर्वोत्तम पर्याय निवडण्याची क्षमता असणं हे जरी अपेक्षित असलं, तरी काही वेळा निवड करण्याची इच्छा इतकी प्रबळ असते, की होणाऱ्या फायद्यांकडे दुर्लक्ष केलं जातं, हा एक विरोधाभासच म्हणायला हवा. कित्येकवेळा जास्त पर्यायांची गरजच नसते आणि त्याचा विचार करण्यात हकनाक पैसा आणि वेळ वाया जातो, तरीसुद्धा आपण आपल्या सहजप्रवृत्तीने जास्त पर्याय शोधत बसतो. एका चक्रव्यूहात, एक मार्ग सरळ अन्नाच्या ठिकाणी घेऊन जाणारा होता, तर बाकीचे अनेक मार्ग अनेक वळसे घेत त्याच जागी पोहोचत होते. यामध्ये सोडलेल्या जवळपास सर्व उंदरांनी, सरळ वाटेने न जाता दुसऱ्या लांबच्या वाटांनी तिथे जाणं पसंत केलं. यंत्राचं बटन दाबून, त्यामधून अन्न बाहेर येण्याची व्यवस्था असलेल्या यंत्रावर कबुतरांना आणि माकडांना प्रशिक्षण देण्यात आलं, तेव्हा असं आढळलं, की त्यांना केवळ एकच बटन दाबून, तितकच अन्न मिळवण्यात अजिबात रस नव्हता. त्यांना एकापेक्षा जास्त बटनांचा पर्याय हवा होता. अर्थात माणसाच्या बाबतीत हे घडेल, अशी शक्यता कमी असली तरी घडणारच नाही, अशी खात्री कोणीही देऊ शकलं नसतं. एका कॅसिनोमध्ये जुगार खेळण्यासाठी, लोकांना टोकन्स देण्यात आली. एका टेबलावर दोन रोलेट खेळण्याची चक्रं बसवलेली होती आणि दुसऱ्या टेबलावर फक्त एकच चक्र होतं. ही तिन्हीही चक्रं तंतोतंत एकसारखी होती आणि माणूस एकावेळी एकाच चक्रावर खेळू शकला असता, पण लोकांनी दोन चक्र असलेल्या टेबलावरच गर्दी केली.

निवड करण्याची इच्छा बाळगणं, ही नैसर्गिकरित्या मनात असते, कारण ती आपल्या अस्तित्वासाठी गरजेची असते आणि ती कुठल्याही फायद्याचा विचार न करता आपण बाळगत असतो. निवड करण्याचे सामर्थ्य, हे लोक इतकं मोठं समजतात, की ते केवळ अंतिम उद्दिष्टांपर्यंत जाण्याचं साधन न मानता, खरोखरीच मौल्यवान आणि गरजेचं मानतात. मग अशा वेळेला, त्या निवड केलेल्या गोष्टीमुळे होणारे फायदे आपल्याला मिळतात, पण मूळ निवड करण्याचं कारण मात्र साध्य होत नाही, तेव्हा काय होतं?

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# महारुद्र

**जी. बी. देशमुख**

*आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधला मराठमोळा झंझावात!*

### भीमराव बापू

सकाळी साडेनऊ-दहाची वेळ असावी. मी सात वर्षांचा होतो. आमच्या राजेंद्र कॉलनीतील घराच्या परसदारात असलेल्या विहिरीजवळ उभा होतो. १९७० सालच्या त्या काळात विहिरीवर पंप असणे ही गोष्ट असाधारण विलासात गणली जात असे. त्यामुळे आमच्या घरच्या विहिरीवर पंप असण्याचा प्रश्न नव्हता. वडिलांच्या भराभर पाणी ओढण्यामुळे खिराडीचा विशिष्ट आवाज येत होता. धोतर

खोचून ते विहिरीतून मोठ्या बादलीने पाणी खेचत होते. इतक्या मोठ्या बादलीने इतके भराभर पाणी आपल्या बाबांना खेचता येते या गोष्टीचे माझ्या बालमनाला भारी कौतुक वाटत असे. प्रत्येक गोष्टीत बाबा फार घाई करत. बादल्या भराभर ओढण्यात सुद्धा तीच विशिष्ट लकब होती. सव्वापाच फुटांची त्यांची सशक्त मूर्ती घामाने थबथबली, परंतु श्रम कुठेच जाणवेना! बादल्या ओढण्याची गती पहिल्या बादलीइतकीच तरुण होती. घिसाडघाईनं काम करणारं त्यांचं रूपडं मी डोळे भरून पाहत होतो. बावन्न वर्षे वय असूनसुद्धा वयानुरूप आपोआप येणारं शारीरिक सुरक्षेविषयीचं किंवा काळजीचं भान त्यांच्या हालचालीत दिसून येत नव्हतं. झोकून देण्याची वृत्ती, विहिरीतून पाणी शेंदण्याच्या साध्या क्रियेतसुद्धा जिवंत होती. बाबांच्या व्यक्तिमत्त्वातील उत्साह, धडाडी आणि उधाण या बाबी अलौकिक होत्या. आमच्या त्यावेळच्या मित्रमंडळींतील मुलांचे वडील साधारणपणे नोकरीपेशात होते. बाबांचे लग्न पस्तिशीत झालेले, त्यात मी चारांपैकी शेवटचे अपत्य. त्यामुळे माझ्या बरोबरीच्या मुलांच्या वडिलांपेक्षा बाबा वयस्क होते. चाकरमानी मंडळींमध्ये असणारा नीटनेटकेपणा व सांभाळून वागण्याची वृत्ती भोवतालच्या वातावरणात रुजली असताना बाबांच्या व्यक्तिमत्त्वातील धाडस, निर्भयता व प्रत्येक बाबतीत रोखठोक नैसर्गिक प्रतिक्रिया व्यक्त करण्याचे त्यांच्यातील साहस हे गुण मला त्या बालवयातसुद्धा इतरांपेक्षा काहीतरी वेगळे असण्याबद्दलची जाणीव करून देत होते.

त्यांना विहिरीवर पाणी शेंदताना बघणे हा माझा आवडता छंद होता. दोराला नेहमी असणारी लहान आकाराची बादली वेगळी करून बाबा मोठी बादली लावत आणि नंतर त्यांचं धडधडाटात पाणी खेचणं सुरू होई. त्या दिवशी ही सगळी मौज मी डोळ्यांत साठवून घेत असताना अचानक पलीकडल्या वस्तीतून काही आरडाओरड ऐकू आली. आमच्या घराच्या मागच्या बाजूला दोनशे मीटर रिकामी जागा होती आणि त्यानंतर शामनगर नावाची मध्यम आकाराची वस्ती होती. जेथून आरडाओरड ऐकू आली ती जागा आमच्या विहिरीजवळून २००-२५० मीटर एवढ्या अंतरावर असावी. एका पिवळ्या रंगाच्या घरातून धूर निघत होता आणि लोक गोळा होऊन काही असंबद्ध असे आविर्भाव करताना दिसून येत होते. पाण्याची मोठी बादली अर्धीअधिक शेंदलेली असताना त्या गर्दी आणि गलक्याकडे बाबांचं

लक्ष गेलं. क्षणार्धात काय प्रकार असावा ते त्यांच्या लक्षात आलं. विहिरीतून अर्ध्यापर्यंत वर आलेली बादली तशीच सोडून ते सुसाट वेगानं त्या घराकडे धावत सुटले. इकडे भरलेल्या बादलीच्या वजनाने वर जमिनीवर पडून असलेला दोर झपाट्याने खाली गेला. भरलेली बादली धडाम असा आवाज करीत दोराला सोबत घेऊन विहिरीत बुडाली. काही सेकंदांतच बाबा त्या धूर निघणाऱ्या घराजवळ विलक्षण गतीने पोचले. त्यांच्या वेगाने पळणे मला तर शक्यच नव्हते. बाबा तिथं पोचले तेव्हा आधीच तिथं उपस्थित असलेल्या गर्दीनं त्यांना सांगितलं, की आतमध्ये त्या घराचा मालक पेटलेल्या अवस्थेत कुणालातरी दिसला आहे, परंतु आता धुरामुळे खिडकीतून काही दिसत नाही. यावर एक शब्दही न बोलता बाबांनी एक जबरदस्त लाथ त्या निळ्या रंगाच्या बंद दरवाज्यावर घातली. केवळ एका लाथेनं काहीशा ठिकठाक वाटणाऱ्या त्या दाराची आतील बंद कडी तुटली, दाराच्या वरच्या सटकणीचा भाग जागेवर राहिला आणि दरवाजा तिला सोडून थाडथाड करीत बाजूच्या भिंतीवर दोन वेळा आदळला. इतक्या लहान वयात एका लाथेत दरवाजा तोडण्याचं जिवंत प्रात्यक्षिक पाहायला मिळाल्यामुळं पुढं हिंदी सिनेमामधील हिरोनं केलेल्या अचाट तोडफोडीवर विश्वास ठेवणं मला जड गेलं नाही. पण हा दरवाजा कचकड्याचा बनलेला नव्हता व मुख्य म्हणजे ती लाथही बळेबळे घातलेली नव्हती. आंतरराष्ट्रीय फुटबॉल सामन्यांमध्ये विनाबूट खेळत असताना पंचेचाळीस यार्डांवरून अचूक गोल मारणाऱ्या अद्‌भुत जादूगाराच्या लाथेसाठी तसं पाहता दार तोडण्याचं हे काम कमी कौशल्याचं होतं. आतमधील धुराची आणि बाहेरून, ''अहो बापू, थांबा! सावकाश-'' अशा केल्या गेलेल्या सूचनांची तमा न बाळगता, विद्युत वेगानं बाबा धुरानं भरलेल्या घरात घुसले आणि धुराआड दिसेनासे झाले! माझ्या काळजात भीती दाटली. इतर बघ्यांना सुद्धा काय करावं ते सुचेना. परंतु बाबांच्या मागोमाग जाण्याची कुणाचीच हिंमत झाली नाही. ३-४ मिनिटांच्या अंतराने डोळे चोळत व धोतराच्या सोग्याने नाकतोंड दाबत बाबा बाहेर आले. संपूर्ण गर्दी त्यांचेकडे आश्चर्यमिश्रित उत्कंठेनं झेपावली. ''सगळं संपलं आहे. त्या माणसाचं जळून भरीत झालं आहे!'' एवढं पुटपुटत बाबा हळूहळू घराकडे येण्यास निघाले. मी त्यांच्या मागोमाग विचित्र मन:स्थितीत एकेक पाऊल उचलत घरी आलो. घरी पोचल्यानंतर त्यांनी सांगितले की धुराने भरलेल्या

घरात ते घुसले आणि काहीही दिसत नसताना सरळ पुढे जात असता त्यांचे पाय मोठ्या धुडास अडखळले आणि काही क्षणात उघड्या दारातून आलेल्या हवेमुळे थोडाबहुत धूर निवळला व त्यांना संपूर्ण जळलेल्या अवस्थेतील ती व्यक्ती जमिनीवर पडलेली दिसली. काही क्षणांपूर्वी त्याला अडखळूनच ते भेलकांडले होते.

मी आजही सांगू शकतो, की बाबा त्या घरात घुसण्याच्या वेळी त्या मृत व्यक्तीत थोडी जरी धुगधुगी असती तरी त्यांच्या परोपकारी स्वभावानुसार बाबांनी त्याच नैसर्गिक गतीने त्या व्यक्तीला खांद्यावर उचलून आणले असते व त्याला दवाखान्यात नेईस्तोवर त्यांचे मन आणि शरीर दोघांनाही स्वस्थता लाभली नसती.

बाबांच्या शक्तिशाली पायांचे किस्से प्रत्यक्ष फुटबॉल मैदानापेक्षा इतर संदर्भात आम्हाला जास्त परिचयाचे होते. जवळ-जवळ १२ वर्षाची राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधील चमकदार कारकीर्द आटोपून १९५१ साली त्यांनी खेळातून निवृत्ती पत्करली. त्याच वर्षी म्हणजे वयाच्या चौतिसाव्या वर्षी त्यांचं लग्न झालं. चार भावंडातील शेवटचा असलेल्या माझा जन्म १९६२ साली झाला. म्हणूनच फुटबॉलसंबंधी आयोजित होणाऱ्या स्थानिक कार्यक्रमात सहभागी होताना बघणं यापेक्षा जास्त फुटबॉलशी त्यांचं असलेलं नातं आम्हाला तेव्हा ठाऊक नव्हतं. परंतु त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील जोश, धडाडी आणि बेधडक वृत्ती ही इतर लोकांपेक्षा वेगळीच नव्हे तर अलौकिक होती, याची जाणीव मला निश्चितपणे झाली होती.

खेळामधून औपचारिक निवृत्ती पत्करल्यानंतर मध्य प्रदेश ऑलिम्पिक असोसिएशनतर्फे त्यांची कोच म्हणून जबलपूर इथं नियुक्ती करण्यात आली होती. नोकरी करण्याची वृत्ती मुळातच नसल्यामुळे ती नोकरी सोडून तीन महिन्यांच्या आतच ते अमरावतीला परत आले. आजच्यासारखा त्या काळात खेळांमध्ये पैसा फोफावला नव्हता. आंतरराष्ट्रीय फुटबॉलपटू म्हणून ओळख, मानसन्मान भरपूर; पण पैसा मात्र बेताचाच! उपजीविकेसाठी म्हणून प्रथम त्यांनी अमरावतीच्या प्रभात टॉकीजसमोर भाड्याच्या सायकलीचे दुकान थाटले. नंतर ते हॉटेलच्या व्यवसायात उतरले. अमरावतीच्या मध्यवस्तीत चहा-कॉफीचे हॉटेल त्यांनी सुरू केले. सकाळी ४.०० च्या ठोक्यावर ते दुकान उघडत असत. खासगी बसेस मध्य प्रदेशातून भल्या पहाटे येत

आणि सकाळी सकाळी चांगला व्यवसाय होत असे. सर्वप्रथम दुकानात पोचून बाबा दुकान उघडत असत व त्याच्यानंतर एक-एक कामगार येत असे. काही कामगार दुकानातच झोपायचे, त्यांना मात्र बाबा दुकानात पोचल्याबरोबर उठावं लागे. व्यवसाय साधा चहा-कॉफीचाच परंतु त्यातही सर्वोत्तम ते ग्राहकांना द्यायचे असा त्यांचा आग्रह असे आणि तो ते पूर्णत्वाला नेत असत.

इतरांना भरभरून खाऊ घालणं, दोन्ही हातांनी लुटवणं, व्यवहारशून्यताच नव्हे तर अविवेक म्हणता येईल इतकं खाऊ-पिऊ घालण्याच्या संदर्भात त्यांचं मन निरागस होतं. त्यांच्या मनामध्ये जेवत असलेल्या पाहुण्याला तृप्त करण्यासाठी धबधब्यासारख्या ऊर्मी उठत त्या केवळ त्यांचा चेहरा पाहून वाचता येत असत. आमच्या घरी जेवायला येणारा पाहुणा व वाढणारे आम्ही अशा दोघांचीही बाबा उपस्थित असल्यास प्रचंड फरपट होत असे. पाहुण्याचे पोट भरले यावर त्यांचा कधीच विश्वास बसत नसे आणि पाहुण्यांची कीव येऊन आम्ही वाढताना हात राखला तर आमची खैर नसे!

तर, मी सांगत होतो बाबांच्या शक्तिशाली पायांच्या मैदानाबाहेरील गमतींविषयी! चहा-कॉफीच्या दुकानात बाबा भल्या पहाटे पोचत आणि कधी भट्टीवर काम करणारा मुख्य कामगार इकडेतिकडे गेलेला असल्यास उकळत्या दुधाचे मोठ-मोठे गंज स्वतःच हलवत. एके दिवशी भट्टीवरील कामगार हजर नव्हता आणि सुमारे पंचवीस लिटर उकळते दूध भट्टीवरून उतरवण्याकरता बाबा स्वतःच पुढे सरसावले. कामाची लगबग आणि टोकाची घाई हे त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य होते. प्रसंग कुठलाही असो, तो लवकर व्हावा, वेळ न दवडता व्हावा, लगेच व्हावा, आताच व्हावा, पुढचा क्षण जणू त्यांचा नव्हताच आणि वर्तमान क्षण त्यांच्यासाठी अंतिम असे. तोंड धुणं, दाढी करणं, अंघोळ करणं, धोतर नेसणं, भांग पाडणं, सायकल चालवणं, फाटक उघडणं किंवा दिनचर्येतील इतर सामान्य गोष्टी म्हणजे साधे चालणंसुद्धा प्रचंड घाईचं असे. त्या माणसाला सवड नव्हती. गती हा त्यांचा स्थायिभाव होता. संपूर्ण जग या माणसाच्या गतीपुढं हतबल होतं, थंड होतं, सावकाश होतं, नीरस होतं. प्रचंड वेगाचा झपाटा घेऊन बाबा जगले. वेगापायी ठेचकाळले, रक्तबंबाळ झाले, दुखावले परंतु ज्या गोष्टीला ठेचकाळले तिच्यासुद्धा ठिकऱ्या उडालेल्या असायच्या, असा नैसर्गिक फोर्स त्यांच्या

गतीत होता. आपल्या घाईत संपूर्ण जगाला फरपटत नेण्याची विलक्षण ताकद त्यांच्या शरीराप्रमाणेच मनातही होती. संपूर्ण प्रसंग बाबांच्या उपस्थितीमुळे त्यांचा होऊन जात असे. त्यांची अंतर्बाह्य वागणूक एकच होती. मनातील भाव आणि त्यांचे उघड प्रकटीकरण या दोन्ही गोष्टी नैसर्गिक रीतीनं एकाच वेळी होऊ देण्याचं असामान्य धाडस त्यांच्यात होतं. प्रेम, राग, दुःख, आनंद, हसू, वाहवा, दाद, निराशा यातली कुठलीही भावना क्षणापुरती दाबून ठेवणं त्यांना जमलं नाही, याचा अर्थ ते तसा प्रयत्न करायचे असा घेऊ नये. धबधब्याचं पाणी जसं बिनधास्त कोसळतं आणि पाहणाऱ्यांची नजर सुखावते तसं बाबांचे जीवन होतं. त्यांच्या अशा निर्मळ स्वभावापायी त्यांच्यापेक्षा वयाने दोन पिढ्या मागे असलेले कित्येक मित्र त्यांच्यावर जीव टाकत. त्यांच्या मनमोकळ्या शैलीमुळे त्यांच्यापेक्षा कमी वयाच्या तरुण मंडळींनासुद्धा त्यांचा सहवास हवाहवासा वाटत असे. ज्यांना फुटबॉलपटू म्हणून बाबांचे मोठेपण माहीत नव्हते अशा मंडळीसाठीसुद्धा 'भीमराव बाप्पू' म्हणजे कुठल्याही मैफलीची जान होते. त्यांच्या व्यवहारातील खेळाडू इतरांना आकर्षित व्हायला भाग पाडायचा.

तर, नेहमीच्या घाईमुळे म्हणा अथवा नजरचुकीने म्हणा, उकळत्या दुधाचा तो गंज बाबांच्या हातात हेलकावला आणि पुढचं काही कळायच्या आत पंचवीस लिटर उकळतं दूध, गंज हातात धरलेल्या बाबांच्या दिशेनं झेपावलं. विजेच्या चपळाईनं बाबांनी गंज समोरच्या दिशेनं भिरकावण्याचा प्रयत्न करत सोडला व स्वत: मागं सरकले. मागच्या बाजूला भिंत असल्यामुळे त्यांच्या मागे सरकण्याला मर्यादा पडल्या आणि स्वत:च्या चपळाईमुळे त्यांनी छातीपासून गुडघ्यापर्यंतचं शरीर वाचवलं. परंतु दोन्ही गुडघ्याखालील भाग उकळत्या दुधात न्हाऊन निघाला! दुकानात उपस्थित ग्राहक व नोकरवर्ग स्तंभित झाला. भीती आणि वेदनेच्या भावना बघणाऱ्यांच्या डोळ्यांत दिसू लागल्या. क्षणभर काय करावे हे कुणासही सुचेना. बाबा शांतपणे जमिनीवर पसरलेल्या दुधातून चालत बाहेर आले. पाच-सात मिनिटांत नेमका कुठला भाग गरम दुधामुळे पोळला आहे हे त्यांच्या लक्षात आलं. दोन्ही पायांना गुडघ्याखालच्या संपूर्ण भागात फोड आले होते आणि तेथील मांस लोंबू लागले होते. आरोग्यशास्त्राच्या भाषेत जळल्याची ती गंभीर केस होती. सर्व कामगारांना आपापले काम करत राहण्याची सूचना देऊन त्याच अवस्थेत

बाबांनी आपली सायकल काढली व सायकलवर टांग मारून अंबापेठमधील एका दवाखान्यात ते पोचले तेव्हा सकाळचे अकरा वाजले होते. डॉक्टरांनी प्रथमोपचार सुरू केले. बाबांना बेडवर झोपण्यास सांगितले. बाबांच्या बाजूला उभे राहून डॉक्टरांनी सर्वप्रथम पोळलेल्या भागावरील जखमा तपासल्या. जखमेवर वेदनादायक प्रथम स्पर्श जाणवताच नकळत बाबांनी जोरात लाथ हवेत हाणली. बाबांनी हवेत फिरवलेली लाथ डॉक्टरसाहेबांच्या छातीवर बसली आणि अनर्थ झाला. पेशंट राहिला एका बाजूला आणि इकडे डॉक्टरांचीच शुद्ध हरपली. झाला प्रकार बाबांच्या लक्षात आला. त्यावेळी डॉक्टरांचा साहाय्यक हजर होता. त्या काळात म्हणजे १९६५-६६ च्या सुमारास अमरावतीसारख्या शहरात ऑटोरिक्षाचा सुळसुळाट झालेला नव्हता. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन बाबांनी क्षणाचीही उसंत न घेता डॉक्टरांना उठवून बसवण्याचा प्रयत्न केला. चेहऱ्यावर पाण्याचा सपका मारल्यावर ते अर्धशुद्धीत आले, तसे बाबांनी त्यांना उचलून बेडवर नीट झोपवले. डॉक्टरसाहेबांच्या साहाय्यकास त्यांच्याजवळ थांबण्यास सांगून स्वत: त्याच अवस्थेत जवळच्याच दुसऱ्या डॉक्टरांकडे गेले. त्या डॉक्टरांना पहिल्या डॉक्टरांची प्रकृती तपासण्यासाठी घेऊन आले! तोपर्यंत पहिले डॉक्टर बरेच सावरले होते. त्यांना तपासून आवश्यक तो औषधोपचार झाल्यावर, नंतर आलेल्या डॉक्टरांनी हे सर्व कसे घडले याची चौकशी केली तेव्हा बाबांच्या पोळलेल्या पायांबद्दल त्यांना कल्पना दिली गेली. त्या डॉक्टरांनी जेव्हा बाबांच्या पोळलेल्या पायांची स्थिती प्रत्यक्ष पाहिली तेव्हा ते म्हणाले, ''भीमराव, तुमची कमाल आहे, या डॉक्टरांपेक्षा तुमची स्थिती गंभीर आहे.'' नंतर त्या दोन्ही डॉक्टरांनी बाबांना सामान्य रुग्णालयात उपचार घेण्याचा सल्ला दिला. परंतु बाबांनी पुन्हा सायकलवर टांग मारली आणि जवळच्याच जोगवाड्यात असलेल्या डॉ. गुल्हाने यांच्या दवाखान्यात ते गेले. डॉ. गुल्हानेंशी त्यांचा पूर्वपरिचय होता. पुढील उपचार डॉ. गुल्हाने यांनी केले.


बाबांच्या मजबूत पायांविषयीचे उदाहरण म्हणून मी हा किस्सा सांगितला परंतु वास्तविक पाहता मजबूत पायापेक्षाही त्यांच्या मनाच्या मजबुतीचे हे उदाहरण होते. स्वत: जवळजवळ २०टक्के भाजलेल्या अवस्थेत असूनही आपल्यामुळे घायाळ झालेल्या डॉक्टरांची प्रथम व्यवस्था करण्याकडे स्वत:स झोकून देणं ही वृत्तीच त्यांच्यातले अलौकिकत्व रेखांकित करते. डॉक्टरांवर

संकट बेतलेले पाहून स्वत:च्या वेदना विसरून जाणं आणि डॉक्टरांविषयी विपरीत विचारसुद्धा मनात न आणणं या गोष्टी त्यांना सर्वसाधारणांच्या वर्गापासून वेगळं नेऊन उभ्या करतात.

डॉ. गुल्हाने यांनी आता सत्तरी ओलांडली असून प्रॅक्टिस बंद केली आहे. भीमरावांची सहनशीलता, खिलाडूवृत्ती आणि डॉक्टर म्हणून गुल्हानेंविषयीचा विश्वास याविषयी डॉ. गुल्हाने विशेष प्रभावित होते. पस्तीस वर्षांपूर्वी जोगवाड्यातील त्यांच्या दवाखान्यात भीमराव घाईघाईने आले व आपल्या पायांवरील धोतर बाजूला सारून गरम दूध सांडल्यामुळे पोळलेले पाय डॉक्टरांना दाखवते झाले. ''जखमांचं स्वरूप पाहून मी गारच झालो. भीमराव या अवस्थेत स्वत: सायकल चालवत आले यावर विश्वास ठेवणं कठीण होतं, पण तसं घडलं होतं! २० टक्के जळण्याची केस म्हणून त्यांना मी प्रथम इर्विनमध्ये (सामान्य रुग्णालयात) चलण्याचा सल्ला दिला. तसे न करण्यातल्या जोखिमेबद्दल त्यांना कल्पना दिली. परंतु ही ट्रीटमेंट मीच करावी आणि केवळ माझ्याच हातून दुरुस्त होण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. टेबलवर घेऊन ट्रीटमेंट सुरू करण्यापूर्वी त्यांना सुंगणी द्यावी लागेल अशी कल्पना दिली असता ते म्हणाले की 'त्याची गरज नाही.' संपूर्ण ट्रीटमेंट होईपर्यंत त्यांनी जे दुखणं सहन केलं ते बघून माझं हृदय पिळवटून निघालं. परंतु त्यांच्यावर दुखण्याचा विशेष परिणाम झाला नाही! त्यानंतर पुन्हा बँडेज लावलेल्या स्थितीत भीमराव सायकल चालवत परत गेले. नंतर दर दिवसाआड ते ड्रेसिंगसाठी येत असत. जळलेल्या केसचं ड्रेसिंग करणं हा कोण कठीण सोहळा, परंतु भीमराव मात्र बँडेज होईस्तोवर दु:ख तर सहन करतच, पण मला छोटेछोटे चुटकुले सांगून हसवायचे. दैवी सहनशीलता, विनोदी वृत्ती आणि डॉक्टरविषयी विश्वास.. काळीज शुद्ध असल्याशिवाय, मन निर्मळ असल्याशिवाय आणि वृत्ती आनंदी असल्याशिवाय घोर संकटात इतकं सहज आचरण अशक्य आहे. भीमरावांची महिनाभर माझ्यातर्फे झालेली ट्रीटमेंट ही अशीच अलौकिक घटना होती, अनेक पेशंट मी दुरुस्त केले पण लक्षात राहणाऱ्या फार थोड्यांपैकी भीमरावांचा क्रमांक वरचा!''

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# सोलापूर मार्शल लॉ १९३०

**अनिरुद्ध बिडवे**

*देश स्वतंत्र होण्यापूर्वीच सोलापूर स्वतंत्र झालं होतं; पण इतिहासाच्या पानांवर ही घटना दुर्लक्षित राहिली. या अद्भुत घटनेचा इतिहास जिवंत करणारं पुस्तक*

### सोलापूर - इतिहासाचा मागोवा

सोलापूर शार दिसन्याला गुलजार।
पान्यामंदी शिद्देशार।।

**‘सोलापूर’! सोळा ग्रामे,** सोळा पुरे असणारे लोककाव्याने गौरवलेले हे शहर. इतिहासपूर्व काळात सोलापूरचा समावेश ‘कुंतल’ देशात केला जात होता. इतिहासकालात हा प्रदेश साऱ्या जगाला अहिंसेचा संदेश देणाऱ्या सम्राट अशोकाच्या ताब्यात होता. इसवीसनाच्या सुरुवातीस या प्रदेशाने सातवाहनांची वैभवशाली राजवट पाहिली. सातवाहन राजे साडेचारशे वर्षे राज्य करीत होते. या काळात हा प्रदेश अत्यंत भरभराटीस आला. त्यानंतर काही काळ आभीरांनी आणि त्रैकूटकांनी या प्रदेशावर राज्य केले. सातवाहनानंतर विदर्भाच्या वाकाटक घराण्याच्या हाती सत्ता आली. अजिंठ्याच्या शिलालेखात नमूद केल्यानुसार वाकाटक राजा हरिषेण याच्या ताब्यात हा प्रदेश होता. वाकाटकानंतर बदामीच्या चालुक्यांनी या प्रदेशावर सत्ता गाजवली. ‘ऐहोळे’ येथील शिलालेख याची साक्ष देतो. चालुक्यानंतर काही काळ राष्ट्रकूटांनी या प्रदेशावर अंमल केला. इसवी सनाच्या दहाव्या शतकाच्या अखेरीस सोलापूर कल्याणीच्या चालुक्यांच्या ताब्यात होते. ‘बसवकल्याण’ ही चालुक्यांची राजधानी होती. यानंतरच्या काळात बसवकल्याण राज्याचे ‘महामंडलेश्वर’ या नात्याने कलचुरी घराण्याने या प्रदेशावर अंमल केला.

बाराव्या शतकात महाराष्ट्रात देवगिरीच्या यादवांची सत्ता दृढमूल झाली. कल्याणीचे चालुक्य, होयसाळ, परमार यांच्यावर विजय मिळवीत यादवांनी या प्रदेशात आपली सत्ता प्रस्थापित केली. सोलापूर आणि आसपासच्या प्रदेशात असणारे यादवांचे वर्चस्व या प्रदेशात सापडणाऱ्या शिलालेखांवरून स्पष्ट होते. यादव घराण्यातील भिल्लम, सिंधन, जैतुगी, कृष्ण, महादेव व रामचंद्र या राजांची वैभवशाली राजवट या प्रदेशाने पाहिली. राजवटी येत-जात होत्या. लढाया होत होत्या. कैक प्रसंगी शक्तीची कसोटी लागत होती; पण अंतरंगात तेवणारी भक्तीची ज्योतदेखील तेवढीच प्रखर होती. बारावे शतक सिद्धेश्वराच्या भक्तीने पावन झाले होते, तर तेराव्या शतकात सगळीकडून वैष्णवांचा पोहा या भूमीवर लोटला होता. समतेचा घोष सर्वत्र दुमदुमत होता. संतांच्या कृपेने देव केवळ घरोघरीचाच नव्हे, तर आपल्यातलाच एक झाला होता. खुद्द यादवराजे देखील स्वतःला अभिमानाने ‘पांढरीफड प्रमुख’ म्हणवून घेत होते, ही अनुभूतीदेखील या मातीने घेतली.

तेराव्या शतकाच्या शेवटी दक्षिणेत मुसलमानांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले. इ.स.१२९४ मध्ये दक्षिणेवर मुसलमानांचा हल्ला झाला असला,

तरी यादवांची राजवट इ.स.१३१२ पर्यंत अस्तित्वात होती. याच वर्षी दिल्लीपती महंमद तुघलकाने दिल्ली सोडून देवगिरी येथे राजधानी केली. काही काळातच दक्षिणेतील सर्व सरदारांनी अफगाण शिपाई हुसेन गंगो ब्राह्मणी याच्या नेतृत्वाखाली बंड केले व दक्षिण देश दिल्लीच्या अंमलातून स्वतंत्र केला. वैष्णव आणि शैव संप्रदायाचे झगडे याच भूमीवर झाले. त्यांचे मनोमीलनही याच पवित्र भूमीवर झाले. नागेश संप्रदायही आपले वेगळे अस्तित्व टिकून होता. बहामनी राज्यस्थापनेनंतर सुमारे १५० वर्षे हा प्रदेश बहामनी राजवटीच्या अंमलात होता. याच काळात सोलापूरचा किल्ला बांधला गेला. बहामनी राजवटीत एक लष्करी ठाणे म्हणून सोलापूरला महत्त्व प्राप्त झाले. कालांतराने बहामनी राजवटीची शकले उडाली आणि नवीन चार राज्यकर्ते अस्तित्वात आले.

अहमदनगरची निजामशाही व विजापूरची आदिलशाही या दोन राजवटींमधील संघर्षाचे केंद्र आता सोलापूर बनले. सोलापूरचा किल्ला कधी निजामशहाच्या ताब्यात असे तर कधी आदिलशहाच्या. कधीकधी तडजोड म्हणून हा किल्ला 'विवाहाचा हुंडा' या स्वरूपात एकमेकांकडे फिरवला जात असे. दक्षिणेतल्या या मुसलमान राजवटीचे विजयनगरच्या हिंदू राजवटीशी वैर होते. त्यामुळे विजयनगरचा पाडाव करण्यासाठी इ.स. १५६२ मध्ये निजामशहा व आदिलशहा यांच्यात एक तह झाला व निजामशहाने आपली मुलगी चाँदबिबी हिचे विजापूरच्या आदिलशहा बरोबर लग्न करून दिले. इ.स. १५६५ मध्ये निजामशहाने अन्य तीन शहांची म्हणजे आदिलशहा, कुतुबशहा व बरीदशहा यांची मदत घेत विजयनगर साम्राज्याचा नाश केला. विजयनगरच्या नाशाचे हे कारस्थान सोलापूरच्या किल्ल्यातच शिजले होते.

सतराव्या शतकात महाराष्ट्रात शिवशाहीचा उदय झाला परंतु छत्रपतींची छाया या भूमीला लाभली नाही. छत्रपतींच्या महानिर्वाणानंतर मराठ्यांचे राज्य बुडवण्यासाठी पातशहा औरंगजेब दक्षिणेत उतरला. पंचवीस वर्षाहून अधिक काळ मराठ्यांचे हे स्वातंत्र्य युद्ध लढले गेले. विजापूरची आदिलशाही व गोवळकोंड्याची कुतुबशाही या दोन्हीं राजवटींचा औरंगजेबाने नाश केला. इ.स.१६८५ मध्ये औरंगजेबाचा मुक्काम सोलापुरात होता. सोलापूर शहर आणि आसपासचा भाग दीर्घ काळ त्याच्या अंमलाखाली होता.

औरंगजेबानंतर इ.स.१७२३ मध्ये त्याचा सरदार चिनकुलीजखान निजामऊल्मुल्क याच्या ताब्यात सोलापूरचा किल्ला होता. इ.स.१७५८ मध्ये नानासाहेब पेशव्यांनी आपल्या राजकीय कौशल्याने हा किल्ला हस्तगत गेला. तेव्हापासून ते मराठेशाहीच्या अस्तापर्यंत सोलापूरचा किल्ला व शहर मराठ्यांच्या ताब्यात होते. इ.स. १७८३ साली शुभरायस्वामी हे सत्पुरुष सोलापुरात आले. या वेळी सोलापुरी कवितेची मिजास सांगत कविराय रामजोशींचा डफ महाराष्ट्रभर कडाडत होता. याच काळात सोलापुरी कवितेला राजाश्रय लाभला.

पण हे वैभव फार काळ लाभले नाही. नादान राज्यकर्ते आणि फितुरीने पोखरलेले सरदार यामुळे मराठेशाहीचा सारा डोलारा पोकळ झालेला. वसईच्या तहाने बाजीराव पेशवा इंग्रजांच्या कब्जात गेला होता. संपूर्ण हिंदुस्थानभर कंपनी सरकारने आपले पाश आवळायला सुरुवात केली होती. इंग्रजांशी बिघाड होत लढाईला तोंड फुटले. इ.स.१८१८ हे मराठेशाहीसाठी पराभवनाम संवत्सर ठरले. अगदी पहिल्या दिवसापासून मराठी फौजा पराभूत होऊ लागल्या. राजधानी सोडून पेशवे पळू लागले. राजधानी शत्रू हाती पडली. यापाठोपाठच सोलापूर जिल्ह्यामधल्या 'गोपाळअष्टी'च्या लढाईत मराठीशाहीचे सेनापती बापू गोखले रणात पडले. दौलतीचे धनी खुद्द सातारकर छत्रपती इंग्रजांच्या हाती लागले. अखेर पेशवाईच्या या संगर तांडवात मराठीशाहीचे आश्रयस्थान ठरले ते सोलापूरच!

सोलापूरने इंग्रज कंपनीच्या सैन्याला कडवा प्रतिकार केला. १० मे १८१८ रोजी जनरल मन्रो याने सोलापूर शहरावर आणि किल्ल्यावर निकराचा हल्ला चढवला. सोलापूर सहजासहजी शरण जाणारे नव्हते. निकराच्या झुंजीनंतर शहर इंग्रजां हाती पडले आणि शहरावर खास इंग्रजी अत्याचार सुरू झाले. 'शहरात मोठी सडघाण केली.' या तत्कालीन पत्रामधल्या वाक्यावरून सोलापुरात त्या वेळी काय घडले असावे याची कल्पना येते. सोलापुरावर झालेला हा पहिला इंग्रजी अत्याचार!

शहर पडले तरी किल्ल्याची झुंज चालूच होती. किल्ल्यावर अद्यापही मराठीशाहीचे निशाण डौलाने फडकत होते. मराठेशाहीचा हा अखेरचा हरहर महादेव होता. कुणालाही चैतन्य यावे असा. गोसाव्यांच्या आणि अरबांच्या पलटणी पराक्रमाची शर्थ करीत होत्या. सोलापूरचे ठाणे रणमदाने

धुंद झाले होते. मग शाहीर रत्नरावाची प्रतिभा बोलू लागली–

खनखन तलवार झडली एक सवा पार
सतरा हजार अरब छाटीला जाला से धुंदकार

परंतु इंग्रजी तोफखाना भारी ठरत चालला. आणि यशश्रीने हुलकावणी दिली.

जसा अवकाळी मेघ वर्षतो
तसा-तसा गोळा विपरीत
गल्लो गल्ली न माणूस
पडलं मुडद्याचं पर्वत।

इंग्रजी तोफखान्याच्या नव्या तंत्रापुढे मराठी लष्कराची झुंज निष्फळ ठरली. मराठी दौलतीचे पुण्य सरले. चार दिवसांच्या मातब्बर झुंजीनंतर मराठीशाहीचे हे अखेरचे ठाणे पडले. भगवा झेंडा खाली आला. मराठी दौलत बुडाली. १४ मे रोजी तहाचे बोलणे सुरू झाले. पाठोपाठच कंपनी सरकारचा अंमल सुरू झाला.

सर्वस्वी परक्या अशा कंपनी सरकारचा अंमल सुरू झाल्यानंतर गतवैभवाच्या स्मृतींची उजळणी करण्यातच बराचसा काळ चाललेला होता. आदल्या शतकापासून जगभरात औद्योगिक क्रांतीचे वारे वाहत होते. तरी हिंदुस्थान मात्र यास अपवाद होता. येथील उद्योगधंदे अद्याप बाल्यावस्थेतच होते. पिढ्यान्‌पिढ्या सरंजामी व्यवस्थेत मुरलेल्या लोकांना अजून सुधारणांचे वारेही लागलेले नव्हते. लोक जागृती अत्यंत मंदगतीने होत होती. परंतु याची सुरुवात झाली होती. पारतंत्र्याविषयी समाजमनात असणारी जी खंत होती, तिचा अविष्कार होण्यास हळुवारपणे का होईना प्रारंभ झालेला होता. सोलापूर शहरदेखील यास अपवाद नव्हते. सोलापुरात १ ऑगस्ट १८५२ रोजी नगरपालिका ऊर्फ शहरसुधारणी सभा स्थापन झाली. सोलापूरच्या राजकीय आणि सामाजिक जीवनात वेळोवेळी जे बदल होत गेले, त्याची ही नगरपालिका साक्षी होती.

हिंदुस्थानाच्या इतिहासात लोकमनात पारतंत्र्याविषयी असलेली खंत अधिक तीव्रतेने प्रकट करण्यास व लोकशिक्षणाचे काम करण्यास वृत्तपत्रे मोठ्या प्रमाणावर कारणीभूत ठरलेली आहेत. सोलापुरात 'कल्पतरू' हे पहिले साप्ताहिक सप्टेंबर १८६७ मध्ये सुरू झाले. इ.स.१८७५ पासून ते

‘कल्पतरू आणि आनंदवृत्त’ या जोडनावाने प्रसिद्ध होऊ लागले. कल्पतरूकारांच्या लेखनात समाजसुधारणांचे भान होते. स्थानिक प्रश्न व आर्थिक दुरावस्था यांचे चित्रण त्यांच्या लेखनातून सातत्याने दिसून येत असे.

१५ ऑगस्ट १८७० रोजी ‘सोलापूर सार्वजनिक सभे’ची स्थापना झाली. पुणे सार्वजनिक सभेच्या मार्गदर्शनाखाली या सभेने कार्य केले. शहर सुधारणा, शेतसारा, दुष्काळ निवारण, नगरपालिकेतील कार्याचे स्वरूप अशा जनतेच्या अनेक अडचणी या सभेने सरकारपुढे मांडल्या. या सभेचे रुपांतर १८८२ मध्ये सोलापूर लोकसभेत झाले. काँग्रेसच्या स्थापनेनंतर स्थानिक पातळीवर काँग्रेसचे कार्य करण्याचे काम सोलापूर लोकसभेने केले.

या वेळेपावेतो सोलापूरमधील कापड उत्पादन पारंपरिक पद्धतीने हातमागावरच होत असे. शेठ मुरारजी गोकुळदास यांच्या प्रयत्नाने इ.स.१८७४ मध्ये सोलापूर स्पिनिंग-विव्हिंग मिल सुरू झाली. यानंतरच्या काळात सोलापुरात ज्या काही कापड गिरण्या सुरू झाल्या, त्यामुळे कापड गिरणी कामगारवर्गात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. या कामगारवर्गाने यापुढील काळात सोलापूरच्या राजकारणात व समाजकारणात मोलाची कामगिरी पार पाडलेली दिसते.

इ.स.१८८० साली सोलापुरात युनियन क्लबची स्थापना झाली. युनियन क्लबद्वारे भरविल्या जाणाऱ्या व्याख्यानमालांतून समाज शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य पार पाडले जात असे. इ.स.१८८५ साली सोलापुरातले दुसरे महत्त्वाचे वृत्तपत्र ‘सोलापूर समाचार’ सुरू झाले. सोलापूरसारख्या गिरणगावात राहणाऱ्या ज्यांना शिक्षणाचा फारसा लाभ नाही, आर्थिक स्थिरता नाही, अशा सामान्य जनांसाठी वर्तमानपत्र सुरू करावयाचे, ही समाचारकारांची भूमिका होती. स्वातंत्र्यलढ्यात सामान्य जनतेने सहभागी होण्यासाठी राजकीय जागृती करण्याची समाचारकारांची ही भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. याच वर्षी ‘सोलापूर वक्तृत्वोत्तेजक सभे’ची सुरुवात झाली.

इ.स.१८८५ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली आणि देशाच्या राजकारणात नवे वारे वाहू लागले. इ.स.१८८६ च्या काँग्रेसच्या कलकत्ता अधिवेशनात अध्यक्षस्थानी असणाऱ्या दादाभाई नौरोजी यांनी ब्रिटिश सरकारविरुद्ध सुरू झालेल्या लढ्याचा शेवट कसा होणार आहे याची भविष्यवाणी केली. ‘भारतीयांच्या प्रत्येक पराभवातून त्यांच्यावरील साम्राज्याचा बोजा वाढत जाईल आणि यामधूनच सत्तेचे हे जोखड फेकून देण्यासाठी

जनता अधीर होईल.’ जागृत होत असलेली जनता हे साम्राज्यसत्तेला न आटोपणारे आव्हान आहे याचा अचूक अंदाज दादाभाईंना आलेला होता. दादाभाई नौरोजी यांच्या सोलापूर भेटीचा ठरलेला कार्यक्रम दोनदा रद्द झाला. अखेर सोलापूर सार्वजनिक सभेच्या प्रतिनिधींनी मुंबईला जाऊन दादाभाईंना मानपत्र अर्पण केले. नंतर दादाभाई नौरोजी इंग्लंड लिबरल पार्टीचे अधिकृत उमेदवार म्हणून पार्लमेंटवर निवडून आले. त्याचाही आनंद सोलापूरकरांनी साजरा केला.

दिवसेंदिवस सोलापूरकरांची देशाच्या राजकारणाबाबतची जागरूकता वाढत चाललेली होती. इ.स.१८८७ मध्ये मद्रास येथील काँग्रेसच्या अधिवेशनासाठी सोलापूरकरांतर्फे सखाराम रामचंद्र किर्लोस्कर, महादेव रामचंद्र रानडे, काशिनाथ वासुदेव नातू, प्रभाकर लक्ष्मण नागपूरकर, गणेश जिवाजी केळकर, गोविंद नारायण काकडे, रामचंद्र मोरेश्वर साने व यशवंत नागेश रानडे (दोघे पंढरपूर) या आठ जणांना प्रतिनिधी म्हणून पाठवण्यात आले. या अधिवेशनाला उपस्थित राहणाऱ्या या प्रतिनिधींना त्याआधीच्या दोन वर्षाच्या काळात देशाच्या राजकारणात काँग्रेसने जे कार्य केले होते त्याचे आकलन झाले. काँग्रेसच्या कामांची नेमकी दिशा समजली. याचे पडसाद सोलापूरच्या राजकारणात व समाजकारणात अल्पकाळातच दिसू लागले. मद्रास अधिवेशनाच्या अनुभवाची चर्चा सोलापुरात एवढी गाजली की पुढच्या अधिवेशनाला आपण उपस्थित राहावे असे प्रत्येक कार्यकर्त्यांना वाटू लागले.

यापुढील अधिवेशन इ.स.१८८८ मध्ये अलाहाबाद येथे होणार होते. या अधिवेशनासाठी सोलापूरकरांनी सखाराम रामचंद्र किर्लोस्कर, विष्णु सीताराम भावे, काझी सुलतान दोस्त मोहम्मद, हनुमानदास शेठ, जयरामशेठ मारवाडी, बापूजी परशुराम फडके, महादेव रामचंद्र रानडे, अब्दुल कादर आणि काशिनाथ वासुदेव नातू या आठ जणांना मतदानाने निवड करून आपले प्रतिनिधी म्हणून पाठविले. या वेळी पाठविलेले प्रतिनिधी मंडळ हे सर्वसमावेशक असे होते. सोलापूरच्या नागरिकांमध्ये सर्व स्तरांत काँग्रेसच्या कार्याविषयी उत्सुकता वाढीस लागलेली होती. त्याचा प्रत्यय या प्रतिनिधी मंडळावरून येत होता. अलाहाबाद काँग्रेसच्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना बद्रुद्दिन तय्यबजी यांनी इंग्रज सरकारच्या ‘फोडा आणि

झोडा’ या कार्यपद्धतीचा कठोर शब्दांत धिक्कार केला. सोलापूरकरांसाठी हे सारे नवलाईचे होते. अधिवेशनासाठी गेलेल्या प्रतिनिधींची परत आल्यानंतर ठिकठिकाणी जाहीर भाषणे ठेवली गेल्याने सरकारने अवलंबलेले फोडा आणि झोडा हे धोरण सोलापुरातल्या दोन्ही समाजांपर्यंत पोहोचले.

राष्ट्रीय काँग्रेसचे जनक ॲलन ह्यूम यांनी इ.स.१८९३ मध्ये सोलापुरला भेट दिली. सोलापूरच्या रेल्वे स्टेशनवर सोलापूरकरांच्या वतीने त्यांचे भव्य स्वागत करून त्यांना मानपत्र देण्यात आले. या सभेच्या अध्यक्षस्थानी वाडीलाल जीवन हे होते. या सभेत आप्पासाहेब वारद, मल्लिकार्जुन पसारे, दिनकर चक्रदेव व सखाराम रामचंद्र किर्लोस्कर यांची राष्ट्रीय काँग्रेसचे सदस्य म्हणून निवड केली गेली. ही घटना सोलापूरच्या राजकारणात राष्ट्रीय काँग्रेसची मुहूर्तमेढ करणारी होती.

इ.स.१८९७ मध्ये सोलापूर शहरात धी राजाबहादुर नरसिंगगिरजी मिल या नव्या कापड गिरणीचा प्रारंभ झाला. सोलापूरमधील कापड गिरणी कामगारांची संख्या देखील वाढत चाललेली होती. त्यावर्षी मुंबई-पुण्यात प्लेगने कहर केला होता. प्लेगला आळा घालण्याच्या निमित्ताने ब्रिटिश अधिकाऱ्यांनी पुणे शहरात लोकांवर जो अन्याय चालवला होता त्याविरुद्ध लोकमान्य टिळक केसरीमधून सातत्याने आग ओकत होते. २२ जून १८९७ रोजी प्लेग कमिशनर रँड या अधिकाऱ्याचा खून झाल्यानंतर ‘सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?’ या केसरीमधल्या अग्रलेखाबद्दल राजद्रोहाचा आरोप ठेवून सरकारने लोकमान्य टिळकांना अटक केली व त्यांच्यावर खटला चालवून दीड वर्षाच्या सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. त्यांच्या शिक्षेची वार्ता समजताच सोलापूरच्या जनतेमध्ये अस्वस्थतेची लहर पसरली. इ.स.१८९८ साली लोकमान्यांची सुटका झाल्यानंतर सोलापूरच्या जनतेने अक्षरशः दिवाळी साजरी केली. काही दिवसांतच ‘पुनश्च हरिओम’ हा अग्रलेख लिहून लोकमान्यांनी पुन्हा नव्याने राजकारणाला सुरुवात केली. नरसिंगगिरजी मिलचे एक मालक सोलापूरचे नगरशेठ म्हणून ओळखले जाणारे आप्पासाहेब वारद हे होते त्यामुळे ही गिरणी वारद गिरणी म्हणून देखील ओळखली जात असे. आप्पासाहेब वारद आणि लोकमान्य टिळकांचा खूप स्नेह होता. टिळकांच्या चळवळीला आप्पासाहेब वारदांचा भक्कम आर्थिक पाठिंबा होता.

इ.स.१८९८ साली सोलापूर शहरात बॉम्बे कंपनीची लक्ष्मी मिल ही कापड गिरणी सुरू झाली. या गिरणीची व्यवस्था ही युरोपियनांकडे होती, तर यापूर्वीच्या दोन्ही कापड गिरण्या या हिंदुस्तानी मालकांच्या होत्या. हा यामधला फरक होता. सोलापूरच्या कापड गिरणी व्यवसायास इ.स.१८७४ झाली सुरुवात झाली, तर प्रत्यक्ष कापड उत्पादनास सुरुवात होण्यास इ.स.१८७७ साल उजाडले. त्यानंतर अवघ्या अकरा वर्षातच सोलापूरच्या कापडगिरणी व्यवसायात युरोपियन मंडळींनी आपले पाय पसरवायला सुरुवात केली होती.

या शतकाअखेर पर्यंतचे देशातले एकूण राजकारण हे सरकारकडून होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडणे या विषयापुरतेच मर्यादित होते. 'स्वराज्य' या संकल्पनेचा अद्याप स्पष्टपणे उच्चार देखील झालेला नव्हता. सामान्य जनतेला अद्यापही आपल्या हक्काची जाणीव झालेली नव्हती. त्यामुळे सामान्य माणूस या साऱ्यांपासून काहीसा अलिप्त असाच होता. किंबहुना हे सारे राजकारण एका विशिष्ट अशा शिक्षित वर्गाच्या मर्यादेतच चाललेले होते.

सोलापूरच्या राजकारणाचा विचार करता या काळात या चळवळीमध्ये आघाडीवर असणारी माणसे ही उच्चशिक्षित वर्गातली– जसे वकील, डॉक्टर, वर्तमानपत्रकर्ते अशी होती. सामान्य सोलापूरकर मात्र या साऱ्यापासून अलिप्त होता. कारण हे सारे काय चालले आहे हे समजण्याची त्याची कुवत नव्हती. वृत्तपत्रे व सार्वजनिक सभेसारख्या संस्था प्रबोधनाचे कार्य करीत होत्या, पण त्यांचा आवाज हा सुशिक्षित माणसांपुरताच मर्यादित होता. अगदी सामान्य माणूस चळवळीला जोडला जावा असा कार्यक्रम काँग्रेसने देखील तोपावेतो लोकांना दिलेला नव्हता. या कारणामुळे या शतकातील काँग्रेसचे कार्य ठरावीक वर्गापुरतेच मर्यादित राहिले. सामान्य सोलापूरकर प्रत्यक्ष या कार्यात सहभागी झालेला नसला, तरी या साऱ्या गोष्टींबद्दल त्यास उत्सुकता मात्र होती. काँग्रेसच्या अधिवेशनास जाणारे प्रतिनिधी, आल्यावर त्यांची ठिकठिकाणी होणारी भाषणे, सोलापूर रेल्वेस्टेशनवरून जाणाऱ्या पुढाऱ्यांना भेटण्यासाठी स्टेशनवर होणारी गर्दी, स्टेशनवर होणारी त्यांची भाषणे, सोलापूरच्या काँग्रेस कार्यकर्त्यांनी त्यांना स्टेशनवर दिलेली फ्रुटपार्टी या साऱ्याविषयी सोलापूरकरांच्या मनात अपार उत्सुकता होती. परंतु प्रत्यक्ष सहभाग अत्यल्प होता, त्यामुळे सोलापूरची


राजकीय चळवळ अद्याप तरी सामान्यजनांची झालेली नव्हती.

औद्योगिक क्रांती झाल्याला एक शतकाहून जास्त काळ लोटला होता. या नव्या यंत्रयुगाने जगभर सुधारणांचे वारे वाहू लागले होते. आपल्याकडचा सामान्य माणूस मात्र अद्यापही सरंजामी वातावरणामधून बाहेर आलेला नव्हता. या क्रांतीचे फायदे-तोटे काय होणार आहेत याची त्याला जाणीव झालेली नव्हती. या नव्या राजवटीतल्या छोट्याछोट्या गोष्टीदेखील त्याला अपूर्वाईच्या वाटत होत्या. सोलापूरचा सामान्य माणूसदेखील याला अपवाद नव्हता. औद्योगिक क्रांतीने काय होणार ते होईलच, पण साधे काचेच्या पेल्यामधून पाणी प्यायला मिळणे हीदेखील त्याला चैन वाटत होती आणि म्हणूनच भाबडी मने गात होती -

वारदाच्या गिरणीमंदी पानी पेत्यात गलासात।
साचं चालती उलासात॥

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# दि न्यू बीजेपी

**नलिन मेहता** अनुवाद : **सुरेश देशपांडे**

*मोदी... आणि जगातील सर्वांत मोठ्या पक्षाच्या जडणघडणीचा प्रवास*

### खेडोपाडीचा पक्ष म्हणून भाजप

उत्तर प्रदेशच्या मध्यवर्ती भागांत प्रतापगड जिल्हयातील कंधई माधोपुर या खेड्यात रात्री उशिरापर्यंत, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची सभा सुरू होती. ‘या खेड्यातील किती जणांना शौचालये मिळाली नाहीत?

त्यांनी हात वर करावे' मुख्यमंत्र्यांनी ध्वनिक्षेपकावरून सभेतील श्रोत्यांना प्रश्न विचारला.

स्वत: मुख्यमंत्री एका वडाच्या झाडाखाली खास उभारलेल्या भगव्या रंगातील व्यासपीठावर पाय खाली सोडून बसले होते. जवळपास ३००० श्रोते सभेत होते. योगी आदित्यनाथ यांची एक तरी झलक नजरेस पडावी म्हणून काही जण झाडांवर चढले होते तर काही जण घरांच्या छपरावर चढले होते. मुख्यमंत्र्यांच्या प्रश्नासरशी अनेक हात वर गेले. गर्दीतून निषेधाचे आवाज आले. योगींनी ध्वनिक्षेपक हातात घेतला आणि विचारले 'इथला जिल्हा पंचायत राज अधिकारी कोण आहे?'

व्यासपीठावर बसलेल्या प्रमुख व्यक्तींच्या रांगेतून एक अधिकारी उठला आणि सावधपणे गर्दीला ऐकायला जाईल अशा बेताने म्हणाला 'या वर्षी पाचशे शौचलयांना मान्यता मिळाली आहे, मागच्या वर्षी पन्नास शौचालयांना मान्यता मिळाली होती.'

'हे बघा' पुन्हा योगी ध्वनिक्षेपकावरून म्हणाले, 'आणि तुम्हीसुद्धा पाहा,' गर्दीकडे अर्थपूर्ण दृष्टिक्षेप टाकत योगी म्हणाले 'उद्यापर्यंत सर्व लाभार्थींच्या खात्यात पैसे जमा झालेच पाहिजेत आणि जर जमा झाले नाहीत तर तुम्हाला जबाबदार धरले जाईल.' त्यानंतर त्यांनी सार्वजनिकदृष्ट्या महत्त्वाचा दुसरा प्रश्न विचारला 'या खेड्यात किती जणांना शिधापत्रिका मिळाल्या आहेत?' प्रश्न ऐकताच गर्दीतून पुन्हा जोरजोरात आरोळ्या ऐकू आल्या. बसलेल्या अधिकाऱ्यांकडे पाहत योगी म्हणाले 'जिल्हा पंचायत राज अधिकारी कुठे आहेत, मुख्य विकास अधिकारी, जिल्हाधिकारी कुठे आहेत?' ते तिघेही पुढे आल्यावर योगींनी त्यांना विचारले 'या खेड्यात शिधापत्रिकेचे वितरण सर्वांत शेवटी कधी झाले?' जिल्हाधिकारी जे जिल्ह्याचे सर्वोच्च अधिकारी होते, त्यांनी मुख्यमंत्री योगी यांना कुजबुजत काही सांगितले, त्यावर योगी यांनी जाहीरपणे आदेश दिला की 'उद्याच इथे शिबिर आयोजित करून पात्रतेप्रमाणे शिधापत्रिका वितरित करा' हे शब्द ऐकल्यावर गर्दीतून मोठ्या आवाजात प्रतिसाद मिळाला. पुढे योगी म्हणाले, 'आठवडाभरात केंद्र सरकार पुरस्कृत अंत्योदय आणि राज्य सरकार पुरस्कृत 'पात्र गृहस्थी' या योजने अंतर्गत योग्यता तपासून घ्या, पंचायतीतील सर्वांना शिधापत्रिका मिळायला हव्यात.'

एकापाठोपाठ एक अशा खेड्यांसाठीच्या योजनांची नावं योगी घेत होते, लाभार्थींच्या नावाची सरकारी यादीप्रमाणे सूची तयार करायला सांगत होते. स्वत: त्यांनी त्यातील काही नावे वाचली आणि त्याप्रमाणे खरोखरीच तसे लाभ मिळाले आहेत का हे लोकांना ताडून बघायला सांगितले. 'गावातील पाण्याचे किती हातपंप बिघडले आहेत? त्यातील किती दुरुस्त केले गेले? केव्हा केले? किती निराश्रित आणि परित्यक्त महिलांना निर्वाह भत्ता मिळतो? (आधीच्या पंच्याहत्तर महिला होत्या त्यात एकतीस जणींची भर पडली) किती दिव्यांग, विशेष व्यक्तींना निर्वाह भत्ता निळतो? (आधी पासष्ट आणि त्यात नवीन सतरा जणांची भर पडली) प्रत्येक बाबतीत संख्या आणि नावे सरकारी यादीतून वाचून दाखविली जात होती आणि गावकऱ्यांना त्याची खात्री करून घ्यायला सांगितली जात होती. ज्यांची नावे यादीत नव्हती त्यांच्यात आणि उपस्थित अधिकाऱ्यात जोरजोरात वाद होत होते. त्यांच्या समस्या सोडविण्याचे आदेश देण्यात आले.

केंद्र सरकारच्या गरिबांसाठी असलेल्या 'पंतप्रधान गृह योजने'संदर्भात जेव्हा योगीजींनी विचारले तेव्हा श्रोत्यांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. भगव्या रंगाचा मफलर गुंडाळून झाडावर बसलेला माणूस तिथूनच ओरडला की, 'मला या योजनेचा लाभ मिळालेला नाही.' मुख्यमंत्र्यांनी त्याला जवळ बोलावले,

'इथे उभे राहून या ध्वनिक्षेपकावरून तू हे सांग' असं म्हटल्यावर गर्दीतून मोठे चीत्कार ऐकायला आले.

व्यासपीठावर उभं राहून आणि योगींकडे पाहत भगव्या मफलरमधला माणूस म्हणाला 'मी अर्ज भरला होता, पण मला काहीच मिळाले नाही' जमलेली गर्दी कदाचित नियंत्रणाबाहेर जाण्याची शक्यता होती.

'केवळ अर्ज भरून चालत नाही' योगी म्हणाले '२०११च्या आर्थिक सामाजिक सर्वेक्षणाच्या अहवालावरून पात्रतेचे जे निकष ठरविण्यात आले आहेत त्यानुसार लाभार्थींची नावे निश्चित करण्यात येतात. त्याच निकषावर निवड होते. जिल्हा पंचायत राज अधिकारी किंवा गावप्रमुख किंवा ग्राम विकास अधिकारी यातील कोणीही नावे ठरवू शकत नाही. पंतप्रधान आवास योजने अंतर्गत ज्या १३६ लोकांना घरे देण्याचे मान्य करण्यात आले आहे ती नावे त्या सर्वेक्षणाच्या निकषानुसारच आहेत. (मागच्या वर्षी १०९ जण)

त्यांची नावे ग्रामपंचायतीच्या कार्यालयातील फलकावर लावलेली आहेत. तुमची नावे त्यात आहेत का ते पाहून घ्या. आणि ज्यांची नावे नसतील त्यांच्यासाठी उद्या इथे शिबिर आयोजित केले असून त्यात प्रत्येक पात्र व्यक्तीला लाभ मिळेल' योगीजींनी जिल्हाधिकाऱ्यांना संपूर्ण यादी वाचून दाखविण्यास सांगितले आणि गर्दीतल्या मंडळींना खात्री करून घेण्यास सांगितले.

चश्मा घातलेल्या आणि मोठ्या मिशा ठेवलेल्या एका सरकारी अधिकाऱ्याने ध्वनिक्षेपक हातात घेऊन, काहीशा विचित्र आवाजात योजनेखाली पैसे मिळालेल्यांची यादी वाचायला सुरुवात केली. 'या वाटपामुळे ज्यांची घराची स्वप्ने साकार झाली आहेत ते १) प्रमोद भारत – अनुसूचित जात २) लक्ष्मण भगवती – अनुसूचित जात...' आणि अशाप्रकारे अनेक.

उत्तर प्रदेश भाजपच्या निवडणुकीतील घवघवीत यशानंतर योगी आदित्यनाथांनी मुख्यमंत्री पदाची धुरा हाती घेतली आणि त्यानंतर बरोबर एका वर्षाने म्हणजेच एप्रिल २०१८मध्ये प्रतापगढमध्ये ही सभा झाली. ही त्यांनी सुरू केलेल्या 'चौपाल' किंवा चावडीवरील ग्रामसभा या अभिनव उपक्रमातील पहिलीच सभा होती. २०१९ मधील आगामी सर्वसाधारण निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून सरकारच्या सामाजिक कल्याण कार्यक्रमातील राजकीय सहभागावर त्यांचा भर होता. सरकारी योजनेतील पैसा हा योग्य ठिकाणीच खर्च होतोय याची जबाबदारी स्वीकारून हे कार्य भाजपच्या प्रयत्नांमुळेच होतेय ही बाब राजकीयदृष्ट्या जाणवून देणे हा मूळ उद्देश होता. उदाहरणार्थ – गावकरी जेव्हा तक्रार करतात की 'स्वच्छ भारत योजने'खाली योगींनी सांगितल्याप्रमाणे रु.१२०००/ मिळायला हवे होते, पण त्यांना रु.१००००/-च मिळाले; तेव्हा त्यांनी स्पष्टीकारण दिले की 'उरलेले रु.२०००/ हे तुम्ही शौचालय बांधले आहे की नाही याची खात्री, (जिओटॅगिंग) करून झाल्यावर मिळतील.' ते पुढे म्हणाले 'सरकारी योजनांची पूर्ण माहिती करून घ्या असे मी तुम्हाला सांगतोय, आरोप प्रत्यारोप यामुळे समस्या सुटत नाहीत आणि जर एखाद्या भ्रष्ट अधिकाऱ्याने लाभार्थीकडे पैसे मागितले तर त्याच्यावर केवळ गुन्हा दाखल होणार नाही, त्याला फक्त तुरुंगात टाकणार नाही तर त्याची संपत्तीसुद्धा जप्त केली जाईल. जेव्हा लोकांना कोणत्या सरकारी योजना आहेत याची कल्पनाच नसते आणि

त्यासंबंधात पूर्ण माहिती नसते तेव्हा भ्रष्टाचाराला वाव मिळतो आणि ही परिस्थिती जनतेचे शोषण करण्यास पोषक ठरते.'

शिवाय सामाजिक कल्याणासाठी होणारा खर्च आणि भाजपचे सामाजिक अभिसरणाचे धोरण यांच्या मिलाफातून जातीयदृष्ट्या निम्न स्तरातील जनतेपर्यंत पोहोचवून त्यांना आपल्याकडे आकर्षित करून घेण्याचा उद्देशही त्यातून साध्य होत आहे. अशा प्रयत्नांतून ज्या खेड्यांपर्यंत पक्ष पोहोचला (उत्तर प्रदेशातील ४४८७ खेडी) आहे तिथे जातीय घटक महत्त्वाचा आहे आणि पक्षाच्या नेत्यांनी तिथे निम्न जातीचे वर्चस्व असलेल्या ठिकाणांना प्राधान्य दिले आहे. समारोप करताना योगी म्हणाले 'आदरणीय पंतप्रधान मोदी यांनी देशभरातील २०००० अशी खेडी निवडली आहेत की तिथे अनुसूचित जाती आणि वंचित लोकांची संख्या ही पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त असेल. पहिल्या टप्प्यात आम्ही त्यांच्यापर्यंत पोहोचणार आहोत, दुसऱ्या टप्प्यात उर्वरित खेडी आणि अखेरच्या टप्प्यात संपूर्ण देशभर आम्ही पोहोचू. या वर्षी १३६ लोकांना घरे मिळाली, ५०० लोकांना शौचालये मिळाली. ही माहिती लोकांना कळली पाहिजे. जन धन योजनेचा नेमका लाभ काय? पंतप्रधान लाभार्थींच्या खात्यात थेट पैसे जमा होण्याच्या संदर्भात बोलतात आणि खरोखर त्यांच्या खात्यात प्रत्यक्ष पैसे जमा होतात, याचा फायदा काय? एखाद्याचे जन धन खाते असेल तर त्यांना सरकारच्या प्रत्येक योजनेचा लाभ मिळेल. त्यांना शौचालयासाठी पैसे मिळतील, घरासाठी पैसे मिळतील, चुलीसाठी अनुदान मिळेल किंवा निर्वाह भत्ता योजनांची आणि इतर योजनांची मदत मिळेल.' यातील संदेश अगदी स्पष्ट होता आणि हे सर्व कॅमेऱ्यात यावे यासाठीच खास तयार केले होते.

मध्यरात्रीपर्यंत चाललेल्या या सभेनंतर योगींनी स्थानिक दलित कुटुंबाच्या घरी भोजन केले आणि आपल्या सर्व कॅबिनेट मंत्र्यांसह त्याच खेड्यात मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर 'आजतक' या हिंदी वाहिनीने वर्णन केल्याप्रमाणे योगींना 'नायक' म्हणून रंगविण्यात आले, याचा संदर्भ प्रख्यात हिंदी सिनेमा नट अनिल कपूर यांच्या 'नायक' या हिंदी सिनेमातील भूमिकेशी आहे. त्यात एक स्थानिक वार्ताहर मुख्यमंत्री होतो आणि तो सार्वजनिक सभाही घेतो. दूरदर्शनच्या बातम्यात, मुख्यमंत्री आपल्या घरी जेवले यामुळे हरखून गेलेल्या त्या कुटुंबातील, दयाराम

सरोज या स्त्रीचा हसरा चेहरा दूरदर्शनवर झळकला. ती अभिमानाने तिच्याकडे जेवावयास आलेल्या पाहुण्यांचा उल्लेख करत होती आणि कोणकोणते पदार्थ केले होते त्याची उजळणी करत होती. 'ओकरा, दही, गूळ, दुधीभोपळा, कैरीची चटणी, गोड भात आणि पोळी.'[१]

## हिंदुत्वाने गती मिळते... लोककल्याणाने प्रगतीचे चक्र फिरते राहते...

मुख्यमंत्री योगी यांचे चौपाल म्हणजे भारतातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या आणि संसदेत सर्वाधिक खासदार पाठविणाऱ्या उत्तर प्रदेशात २०१४पासून भाजपने राबविलेल्या राजकीय योजनांचं सार आहे असं म्हणता येईल. प्रथम लोककल्याणकारी योजनांसाठी ग्रामीण भागावर भर देणे, दुसरे म्हणजे खालच्या जातींना भाजपच्या वर्तुळात आणि विस्तारित हिंदुत्वाच्या कक्षेत सामावून घेणे. तिसरे म्हणजे योगींची मुख्यमंत्री या नात्याने तिथली उपस्थिती ही भाजपच्या पूर्ण हिंदुत्वाचा संदेश देते. नाथ संप्रदायातील पुरातन गोरखनाथ पीठाचा प्रमुख असलेला एक भगवा वस्त्रधारी संन्यासी आज लखनौसारख्या सत्ताकेंद्रात बसला आहे. योगी आदित्यनाथांनी प्रतापगढमध्ये म्हटल्याप्रमाणे 'मी ज्या परंपरेतून आलो आहे ती शतकानुशतके समाजातल्या वंचितांसाठी, दलितांसाठी काम करत आहे, त्यांच्यात राहून 'अलख निरंजन'ची चळवळ चालवत आहे. मी तीच परंपरा पुढे नेतोय. माझ्यासाठी ही एक सेवा आहे... राजकारण नाही!'[२]

हिंदीबहुल भागातील विशेषत: उत्तर प्रदेशातील भाजपचे वर्चस्व, २०१४पासून भाजपची राष्ट्रीय स्तरावर बाजू भक्कम करण्यास पोषक ठरले आहे. पक्षाने अनेक स्तरांवर बदल केल्यामुळेच हे शक्य झाले आहे. भारताच्या शहरी आणि ग्रामीण भागातील एक प्रबळ पक्ष म्हणून भाजपचे स्थान आणि हिंदी पट्ट्यातील एक अनिवार्य पक्ष म्हणून असलेले मुख्य स्थान, संपूर्ण बदल स्वीकारल्यामुळेच हे शक्य झाले. नागरी भागातील पक्ष अशी भाजपची प्रतिमा होती, खरेतर त्यावेळेसही हे खरे नव्हते! तरीदेखील २०१४पासून नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले आणि अमित शाह पक्षाध्यक्ष (२०१४-२०१९) झाले तेव्हापासून पक्षाने आपल्या सामाजिक आणि

राजकीय धाटणीत खोलवर जनुकीय बदल केले. या बदलाचा भारतीय राजकारणावर प्रचंड प्रभाव पडला!

◆

या पुस्तकाचा पहिला भाग हा भारतातील सर्वाधिक लोकसंख्येच्या मोठ्या हिंदी राज्यातील राजकारणावर सखोल भाष्य करतो. राजकारणाची संपूर्ण दिशाच बदलणारे नवीन जात वास्तव आणि त्याची मांडणी यामुळे पूर्वसमजुतीच्या नव्या बांधणीवर भर आहे. २०१३ नंतर भाजपने विरोधकांना वारंवार संभ्रमात पाडले आहे, परंपरागत शहाणपणावर मात करत ग्रामीण आणि शहरी भागात निवडणुका जिंकल्या आणि आपली पाळंमुळं राजकीय पक्ष म्हणून रुजविली.[३] हा जो बदल झाला आहे आणि तो करून आणणारी यंत्रणा यामुळे परंपरागत भारतीय राजकारणात उलथापालथ घडून आली जी आपण जाणतोच!

दुसरे प्रकरण भाजपने नव्यानेच ग्रामीण भागात मारलेली मुसंडी यावर आहे. प्रकरण ३,४,५ भाजपची राजकीय प्रगती का आणि कशी झाली यावर आहे. या प्रगतीचे सर्वच पैलू अजूनही संपूर्णपणे समजून आलेले नाहीत. एक मोठा समज असा आहे की भाजपने आपल्या विजयात ठेवलेले सातत्य हे (केवळ) नरेंद्र मोदी यांच्यामुळेच! त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा राजकीय प्रभाव आणि निव्वळ हिंदुत्वाच्या भावनेला केलेले आवाहन... आणि मोदींनंतर हे टिकणार नाही! मोदींचे आवाहन हे खरे आणि वास्तविक होते आणि नि:संशय तेच हा बदल घडवून आणण्यास कारणीभूत ठरले आहे. तरीही पक्षाने हिंदी भागांमध्ये, ग्रामीण भागातील निम्नस्तरीय जात, वर्ग यांमध्ये मारलेली मुसंडी हे मोदींच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या रचनेतील बदलामुळे शक्य झाले.

भाजपने तीन स्तरांवर मूलभूत बदल केले.

एक, उत्तर प्रदेशातील सर्व हिंदू जातींचे सामाजिक प्रतिनिधित्व करणारा पक्ष होण्यासाठी त्यांनी आपल्या पक्षरचनेत मुळापासून क्रांतिकारी बदल केले. एक मुस्लिम लोक सोडले तर (आणि ती महत्त्वाची पात्रता ठरते) २०१३ नंतर भाजपने इतर कोणत्याही पक्षापेक्षा प्रभावशाली आणि सत्तेतील पदांवर अधिक सामाजिक स्तरातील आणि जातींतील लोकांना स्थान दिले

आहे. तिसऱ्या प्रकरणातील दिलेल्या नवीन माहितीनुसार हे बदल कसे घडले हे अनेक सूचीमध्ये दिसून आले आहे. एकदा आपले सरकार स्थापन केल्यावर भाजपचे राष्ट्रीय आणि राज्यातील उमेदवार, राज्यातील कार्यालयीन कर्मचारी, जिल्ह्यांचे अध्यक्ष, आणि मंत्री पक्षाने नेमले. उच्च जातीचे प्राबल्य असलेला जुना भाजप आता संपला होता. आणि निवडणुकीत प्रभावी ठरणारा नवीन भाजप हा बदलाशी थेट जोडला गेला. आपला नागरी क्षेत्रातील पाया कायम ठेवत, मध्यम वर्ग आपल्या पाठीशी आहेच आणि उच्च जातीय वर्गाचा पाठिंबा असलेला हा पक्ष जातीय प्रतिनिधित्वात लक्षणीय बदल करत, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या निम्नस्तरीय लोकांचा पक्ष म्हणून उदयाला आला! भाजपचे पहिले मागासवर्गीय मुख्यमंत्री कल्याण सिंग (उत्तर प्रदेश १९९१-९२ ते १९९७-९९)[४] यांच्या नेतृत्वाखाली भाजपने मागासवर्गीयांत बऱ्यापैकी प्रवेश मिळवला. पण सध्याचा पक्षातील बदल हा विस्तृत आणि सर्वदूर पोचणारा आहे. पक्षाचे जनरल सेक्रेटरी के. एन. गोविंदाचार्य यांनी असे म्हटले होते की सामाजिकदृष्ट्या वर येण्याची इच्छा असलेल्या लोकांना आणि जातीय-वर्गीय प्रश्न समजणाऱ्या लोकांना पक्षात आणायचे असेल आणि पक्षाला निवडणुकीत जिंकायचे असेल तर पक्षाने आपल्या नेतृत्वाचा 'चाल, चारित्र्य आणि चेहरा'[५] बदलायला हवा! जवळपास तीन दशकांनंतर यूपीच्या बहुतेक भागांमध्ये आणि भाजपच्या पुनरुत्थानाच्या केंद्रस्थानी अगदी संपूर्ण नाही पण हा लक्षणीय बदल झालेला दिसून येतो.

दुसरे म्हणजे, भाजपने यूपीतील १,४७,१६४ मतदान केंद्रांमध्ये आपल्या पक्षरचनेत अगदी तळापर्यंत बदल करून बांधणी केली.[६] पुस्तकातील प्रकरण चारमध्ये, भाजपने आपल्या पक्षातील नवीन कार्यकर्त्यांना फक्त मतदारांना निवडणुकीच्या वेळी मतदान केंद्रापर्यंत आणण्याचे काम दिले होते असे नाही तर सरकारी कल्याणकारी योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे उदा. मोफत गृह योजना, घरगुती गॅस जोडणी, खात्यात थेट पैसे जमा करणे ही निवडणुकांबाहेरील कामेही दिली होती! सगळेच पक्ष लोककल्याणासाठी पैसे खर्च करतात पण नेमकेपणाने राजकीय उद्दिष्टावर लक्ष केंद्रित करून, खेड्यांतील अशा प्रकारचे लाभार्थी लोकांची सरकारी यादी मिळवून त्यांच्यापर्यंत लाभ पोचणे ही बाब उत्तर भारतासाठी नवीन होती! अशा प्रकारचे काम

खूप आधी दक्षिण भारतात झाले होते खासकरून तामिळनाडूत, जिथे स्वयंसेवकाधारित अखिल भारतीय द्रविड मुन्नेत्र कळघम आणि द्रविड मुन्नेत्र कळघम सारखे पक्ष होते.

तिसरे, भाजपने कोणताही न्यूनगंड न बाळगता आपल्या पूर्वीच्या हिंदुत्वाच्या विचारधारेवर पुनश्च लक्ष केंद्रित केले. उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री दिनेश शर्मा यांनी, लखनौ विधानसभेतील त्यांच्या कार्यालयात सांगितले होते की भाजपच्या विजयाचे मुख्य कारण म्हणजे आम्ही आमची मूलतत्त्वे बदलली नाहीत. आम्ही हरलो तरीही आमच्या मतांवर ठाम होतो आणि जिंकलो तरीही तसेच होतो! लोकांचा आमच्यावर विश्वास आहे, कारण आम्ही नफातोट्याचे राजकारण करत नाही![७] भाजपच्या विजयाविषयी मुस्लिमांना काय वाटते, ज्यांची यूपीतील लोकसंख्येपैकी १९.२ टक्के लोकसंख्या आहे (राष्ट्रीय पातळीवर १४.२ टक्के) यावर प्रकरण ५मध्ये विस्तृत चर्चा आहे.[८] हिंदुत्व हे जरी भाजपच्या वाढीचे मुख्य कारण असले तरी हेही लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की केवळ हिंदुत्व याच मुद्द्यावर मते आणि जनादेश मिळालेला नाही!


तसेही हिंदुत्व हा काही भारतीय राजकारणासाठी नवीन विषय नाही. परंतु कळीचा प्रश्न हा आहे की मग यापूर्वी भाजप या मुद्द्यावर का जिंकू शकली नाही? अगदी रामजन्मभूमी आंदोलन १९८९मध्ये ऐन भरात असताना, आंदोलनाच्या केंद्रस्थानी असलेल्या अयोध्येत कम्युनिस्ट पक्षाने (सीपीआय) भाजपला चीतपट केले होते आणि मित्रसेन यादव खासदार म्हणून निवडून आले होते. तसेच मंदिर आंदोलनाचा जेव्हा अगदी जोर होता तेव्हासुद्धा मंदिराच्या राजकारणाचा अयोध्येत विजय झाला नव्हता. त्या वेळेस श्रीराम या नावाभोवती जनभावना केंद्रित झाली होती, जातीय दृष्टिकोनाने मंदिर भावनेवर मात करत अयोध्येतील फैजाबाद जागेवर यादव समाजाचा उमेदवार जिंकून आला हे लखनौ येथील ज्येष्ठ पत्रकार प्रांशू मिश्रा यांनी निदर्शनास आणून दिले.[९] १९९१ मधील प्रांतीय निवडणुकीतील भाजपचा मतांतील वाटा हा, समाजवादी पक्ष, दलित समर्थक पक्ष आणि काँग्रेस पक्ष यांच्या एकत्रित मतांपेक्षा कमी होता![१०]

महत्त्वाची गुरुकिल्ली ही होती की २०१४ नंतर मोहिमेच्या सूत्रधारांनी लोककल्याण आणि जातीय प्रतिनिधित्व याचे राजकीय महत्त्व ओळखले.

लोकभवन जिथून योगी आदित्यनाथ काम करतात तिथल्या अगदी योगींबरोबर राहून काम करणाऱ्या एका ज्येष्ठ अधिकाऱ्याने मला चौपाल (ग्रामसभा) कार्यक्रम कसा दूरपर्यंत पोचतो हे समजावून सांगितले. 'भाजपच्या मतांचा पाया म्हणजे हिंदुत्व' असे आपण समजतो, हिंदुत्वाने गती मिळेल पण चक्र फिरविण्याचे काम मात्र 'खात्यात थेट रक्कम जमा होणे, त्यातून सामाजिक फायदे होणे' यानेच होते! *हिंदुत्व हे हत्तीच्या दातांसारखे आहे, भाजपचे खरे दात म्हणजे कल्याण! हिंदुत्व एकतर्फी गती देणारे तर लोककल्याण सकलांसाठी फिरणारे चक्र आहे!*[११] महत्त्वाचे असे लक्षात घ्यायला हवे की 'लोककल्याण' किंवा 'विकास' हे शब्द इथे नेहमीच्या (पायाभूत सोयी) अर्थाने योजलेले नाहीत तर केंद्र सरकार अनुदानित अनेक योजनांतील रोख रकमांचे थेट वैयक्तिक लाभ पुनर्वाटप होणे या अर्थाने योजले आहेत! नेत्यांनी या गोष्टी मनापासून अंगीकारल्यामुळे पक्षाला राजकीयदृष्ट्या स्वीकारले गेले आणि ज्याला 'नवीन भाजप राजकीय व्यवस्था' असे म्हणतात ती अस्तित्वात आली! हा भाजपचे नवीन प्रारूप आणि काँग्रेसी 'व्यवस्था' यात मूलभूत फरक आहे. काँग्रेसी व्यवस्था ही 'एकमता'च्या राजकारणावर आधारलेली होती आणि १९५०पासून १९९० पर्यंत राजकीय वर्चस्व राखण्यास साहाय्यभूत ठरली![१२]

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# मुंबई आफ्टर अयोध्या

एक बदलते शहर

**जीतेंद्र दीक्षित** अनुवाद **: वर्षा वेलणकर**

*आयोध्येतील वादंग ते माफियाराजचा विळखा, मुंबईच्या स्थित्यंतराची पाळंमुळं स्पष्ट करणारा अनोखा दस्तऐवज*

### अयोध्येपूर्वीचे बॉम्बे

एका कळकट्ट कढईतून उकळत्या पाम तेलाने माखलेला एक झारा अचानक झेपावला आणि यशवंतच्या पार्श्वभागाचा त्याने नेम घेतला. वेदनेने तो कळवळला. उकळत्या तेलातून निघालेल्या झाऱ्याने त्याची पॅन्ट आणि त्याखालच्या त्वचेची लाहीलाही झाली होती. रस्त्यावर तडफडणाऱ्या यशवंतची

ती अवस्था पाहून त्याच्या दोन साथीदारांनी तिथून पळ काढला. हा सगळा तमाशा पाहायला मोठी गर्दी जमली. घाबरून काही दुकानदारांनी आपल्या दुकानांचे शटर बंद केले. रस्त्याच्या कडेला दुकान थाटून बसणाऱ्यांना, दहशत म्हणजे यशवंत, हे समीकरण माहीत होते आणि त्याची अशी अवस्था कधी होऊ शकते, हे त्यांच्या कल्पनेच्या बाहेरचे होते. म्हणून ज्याने त्याची ही अवस्था केली, त्या उमादत्तला आता भयंकर परिणामांना सामोरे जावे लागणार, हे नक्की, हा विचार प्रत्येकाला चाटून गेला.

साधारणत: १९७०चा तो पूर्वार्ध होता आणि नव्याने जन्म घेतलेल्या शिवसेना या राजकीय पक्षाच्या अस्तित्वाची जाणीव शहराला होऊ लागली होती. तरुणांच्या भरघोस प्रतिसादामुळे सेवाभावी स्वयंसेवकांची भक्कम फळी असलेल्या एखाद्या संस्थेप्रमाणे तिचा आवाका वाढू लागला होता आणि स्वत:च्या उद्देश्यांच्या पूर्ततेसाठी हिंसेचा आधार घेण्यासही हे लोक मागे पुढे पाहत नसत. कम्युनिस्ट विचारसरणीची कास धरून राजकारण करणाऱ्या गटांची शहरात वाढती संख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी म्हणून सत्ताधारी काँग्रेस पक्षाचा या नवीन राजकीय गटाला संपूर्ण पाठिंबा होता. शिवसेनेच्या जडणघडणीत जी अंगावर धावून जाण्याची प्रवृत्ती होती, ती दाखवण्यासाठी आपण शिवसेनेचे पदाधिकारी असल्याची बतावणी करण्यास अनेकांनी सुरुवात केली होती. यशवंत अशा लोकांपैकी एक होता. दक्षिण बॉम्बेच्या काळबादेवी आणि झवेरी बाजार भागात कपड्यांचे आणि दागिन्यांचे व्यापारी मोठ्या प्रमाणात आहेत, तिथे यशवंतने आपली दहशत स्थापित केली होती. छोट्या दुकानदारांकडून पैसे वसुलीचे धंदे तो करत असे. कुणी विरोध केला, तर त्याला चोप देण्यास तो मागे पुढे पाहत नसे. एक रामपुरी चाकू तो सतत जवळ बाळगायचा आणि खंडणी द्यायला नकार देणाऱ्या दोन लोकांना त्याने भोसकले होते. स्थानिक व्यापारी त्याच्याशी वाद घालण्यास उत्सुक नव्हते आणि म्हणून त्याची रीतसर पोलीस तक्रार केली होती. पण प्रतिकार झाला नाही की, सत्ता प्रस्थापित होण्यास वेळ लागत नाही. यशवंत याचे उत्तम उदाहरण होता. त्याच्याविरुद्ध जाण्याची कुणाची हिंमत नव्हती. पण आज तो दिवस नव्हता.

संपूर्ण टक्कल असलेला लठ्ठ शरीरयष्टीचा उमादत्त त्याच्या पारंपरिक उत्तर भारतीय पोशाखात वावरायचा. धोतर आणि कुर्ता घातलेल्या या

पहिलवानाने झवेरी बाजारातील एका रस्त्याच्या कडेला वडापाव, समोसा आणि भज्यांचा ठेला लावला होता. रोज दुपारी दोन वाजता ते जेवायला घरी जात असत आणि दुपारची एक झोप काढून साधारण पाच वाजता परतत असत. या वेळेत ठेल्यावर त्यांचे कामगार धंदा सांभाळत. अगदी याच वेळेत यशवंत नित्यनेमाने आपल्या साथीदारांना, त्याची हाजी हाजी करणाऱ्यांना घेऊन ठेल्याजवळ अवतरायचा आणि गरम पदार्थांवर ताव मारून, पैसे न देता निघून जायचा.

एकदा ठेल्यावर काम करणारा नेहमीचा मदतनीस गैरहजर असताना त्याच्या जागी मुन्ना नावाच्या एका छोट्या मुलाला मदतीला बोलावले होते. नेहमीप्रमाणे त्याही दिवशी यशवंत ठेल्यावर पोचला. सोबत त्याचे दोन चमचे होतेच, ज्यांनी मस्त गरम पदार्थांवर हात साफ केले. यशवंतच्या शर्टाची वरची दोन बटणे कायम उघडी असायची आणि त्यातून त्याची जाडजूड सोन्याची चेन नजरेस पडायची. यशवंतच्या 'लौकिकाची' माहिती छोट्या मुन्नाला नव्हती. त्यामुळे खाणे झाल्यावर त्याने यशवंतकडे पैशाची मागणी केली. तो एकदम भडकला आणि त्याने मुन्नाच्या कानशिलात एक लगावली आणि हातातली रिकामी ताटली त्याच्या अंगावर भिरकावली. दुसरीकडे तोंडातून शिव्यांची बरसात होत होती. पुन्हा कधी पैसे मागितले, तर ठेला बंद करण्याची धमकी यशवंतने मुन्नाला दिली.

संध्याकाळी जेव्हा उमादत्त ठेल्यावर आले, तर अचानक मुन्नाने आपण काम सोडून जात असल्याचे जाहीर केले. तो गयावया करत होता. मग दुपारी घडलेला सगळा प्रकार कळल्यावर त्यांना खूप आश्चर्य वाटले आणि त्यांनी आधी मुन्नाला शांत केले. पहिलवान असलेल्या उमादत्त यांना झाला प्रकार पचनी पडणे कठीण होते. कुणी इतक्या सहजतेने आपल्याला धमकी देण्याची हिंमत करू शकतो, हे त्यांना सहन झाले नाही.

दुसऱ्या दिवशी दुपारी जेवायला घरी जाण्याऐवजी उमादत्त ठेल्यावरच थांबले. पोर्तुगीजांची शेवटची निशाणी असलेल्या बटाटा वड्याचा एक नवीन घाणा त्यांनी तेलात सोडला होता. आजही मिल मजदूर आणि कष्टकरी कामगारांचे दुपारचे जेवण म्हणजे हा वडापाव होते.

पिवळे धम्म, गोल बटाटे वडे काळ्या कढईत तरंगू लागले आणि तिकडे यशवंत त्याच्या चमच्यांसोबत ठेल्यावर आला. गरम वडापावच्या

दोन-तीन प्लेट घशात गेल्यावर त्याने बाजूच्या चहाच्या टपरीवरून चहा मागवला आणि नेहमीप्रमाणे तो जायला लागला, तेव्हा उमादत्त एकदम जोरात ओरडले. ‘‘ए, पैसे कौन देगा?’’

‘‘अपने बाप से पैसे मंगता हैं? ये ले,’’ असे म्हणत यशवंतने हातातल्या गरम चहाच्या ग्लासातील चहा उमादत्त यांच्यावर भिरकावला आणि त्यामुळे उमादत्त यांचे कपाळ भाजले. प्रत्युत्तर म्हणून त्यांनी एक जोरात ठोसा त्या गुंडाच्या नाकावर मारला. लगेच यशवंतचे साथीदार उमादत्त यांच्यावर धावून आले. पण या पहिलवान माणसाकडे काम करणाऱ्या मुलांनी त्यांना रोखून धरले. उमादत्तची हिंमत पाहून यशवंतचे डोके सटकले आणि संतापाने थरथरत त्याने आपला रामपुरी बाहेर काढला. पण तो उमादत्तवर वार करण्यापूर्वीच उमादत्त यांनी उकळत्या तेलातील तापलेला झारा उचलला आणि सर्व ताकदीनिशी यशवंतच्या ढुंगणावर मारला. एकदम किंचाळत यशवंत जमिनीवर कोसळला. हे पाहून त्याचे दोन साथीदार पळून गेले.

नंतर त्यांनी पोलिसांना बोलावून यशवंतला त्यांच्या स्वाधीन केले आणि भक्कम रक्कम देऊन त्यांचे हात गरम करत यशवंतवर चांगले कायदेशीर कलम लावून त्याची कोठडीत मस्त ‘खातिरदारी’ करावी अशी विनंतीदेखील केली. त्या दिवसानंतर यशवंत आणि त्याचे साथीदार त्या भागात कुणाच्याही नजरेस पडले नाही. उमादत्तच्या शुभचिंतकांनी त्याला या सगळ्या प्रकारच्या परिणामांची जाणीव करून दिली. पण तसे काहीच कधी घडले नाही. एका रात्रीत उमादत्त हिरो बनले. त्यांनी परिसरातील खलनायकाचा चांगलाच बंदोबस्त केला होता. आता ते तिथल्या लोकांचे प्रतिनिधी म्हणून ओळखले जाऊ लागले आणि त्यांची लोकप्रियता एकदम वाढली. मग छोट्या-मोठ्या तक्रारी आणि अडचणी घेऊन परिसरातील लोक त्यांच्याकडे येऊ लागले. आता उमादत्त यांच्या वाकड्यात जाण्याची कुणाची ताकद उरली नव्हती. जो असे चमत्कार घडवून आणू शकतो, त्याला लोक देवत्व बहाल करतात, ही जगाची रीत आहे. यशवंतच्या दहशतीला मोडून काढणे, हे झवेरी बाजार आणि काळबादेवी परिसरातील लोकांसाठी चमत्कारापेक्षा तसूभरही कमी नव्हते.

देशाच्या इतर भागांतून शहरात स्थायिक झालेल्या उमादत्तसारख्या

स्थलांतरित लोकांसाठी यशवंतसारख्या गुंडांशी सामना हे सुरुवातीच्या त्यांच्या शहरातील वास्तवातील संघर्षाचे एक उदाहरण होते. काहींनी असे संघर्ष करत, त्याचा स्वीकार करत आपला जम या नवीन शहरात बसवला. तर काहींनी हार मानून परत जाणे सोयीस्कर मानले. बॉम्बे या शहरात जर नागरिक म्हणून बस्तान बसवायचे असेल, तर इथल्या जीवनमानाचे रहाटगाडगे ओढत राहण्याची ताकद आजमावण्यासाठी ही पहिली परीक्षा होती.

उमादत्त दीक्षित म्हणजे माझे आजोबा म्हणजे वडिलांचे वडील. ते १९५०च्या सुरुवातीला त्यांचा तरुण मित्र रामकुमारसोबत म्हणजे माझ्या आईच्या वडिलांसोबत या शहरात आले होते. तेव्हाचे बॉम्बे म्हणजे कृष्णधवल सिनेमातून जगाला माहीत होते. तेव्हा रस्त्यावर ट्राम धावायची, काही आगगाड्या या वाफेच्या इंजिनावर चालायच्या, रोज रस्ते धुतले जात असत, लोकलला फक्त नऊ डबे होते, पोलिसांच्या गणवेशाचा रंग निळा होता आणि छोट्या अंतरांवर जाण्यासाठी लोक तेव्हा अगदी आवडीने व्हिक्टोरिया घोडागाडी पसंत करायचे. दक्षिण बॉम्बेतील व्हिक्टोरिया टर्मिनसवरून निघून अंधेरीसारख्या उपनगरात जाणे म्हणजे दुसऱ्या शहरात जाण्यासारखे होते.

## स्थलांतरित : पोर्तुगीज ते पुरबी

माझे दोन्ही आजोबा हे उत्तर प्रदेशातील बाराबंकी जिल्ह्यातील एका गावातील रहिवासी होते. दोघांच्याही पूर्वजांकडून त्यांना मिळालेल्या शेतजमिनी गावाला लागून होत्या आणि शेती हे उपजीविकेचे एकमेव साधन होते. गावातील लोकांना शेतात काम देणे आणि मग आलेल्या उत्पन्नातून त्यांना वाटा देणे अशीच पद्धत होती. गहू, पुदिना, मोहरी आणि डाळी यांची लागवड केली जायची. उगवलेले बरेच धान्य विक्रीसाठी पाठवण्यात येत असे. मात्र घरात आवश्यक तेवढा साठा ठेवून उर्वरित धान्य विकले जायचे. पण विसाव्या शतकात त्यांच्या या भरभक्कम शेतजमिनीतील खूप मोठा भूभाग ब्रिटिश सरकारने त्यांच्या महत्त्वाकांक्षी शारदा धरण प्रकल्पाकरिता संपादित केला. उत्तर प्रदेशातील हा सगळ्यात मोठा प्रकल्प होता आणि काही हजार किलोमीटरपर्यंत त्याचे मोजमाप होते. ज्यांच्या जमिनी घेतल्या, त्या शेतकऱ्यांना अगदी नाममात्र मोबदला देण्यात आला आणि त्यामुळेच उदरभरणासाठी

आता दुसरा कामधंदा शोधण्याशिवाय दोन्ही कुटुंबांना पर्याय उरला नाही, कारण कुटुंब वाढत होते पण जमिनीचा शिल्लक तुकडा मात्र तेवढाच होता. उत्तर भारतात नोकरी किंवा उत्पन्नाच्या संधी फारच तोकड्या असल्यामुळे त्यावेळच्या भारतातील इतर शहरांमध्ये जाणे आणि काम शोधणे हा एकमेव पर्याय या भागातील असंख्य कुटुंबांनी निवडला. सुरुवातीला घरातील फक्त पुरुष मंडळी अशा वेगवेगळ्या शहरांमध्ये काम शोधण्यासाठी बाहेर पडली. काम मिळून थोडा पैसा गाठीशी आला आणि त्या शहरात राहायची व्यवस्था झाली की मग उर्वरित कुटुंबीयांना तिकडे बोलावून घेतले जात असे.

जगभरातील बहुतांश सगळ्याच शहरी भागांचा विकास हा स्थलांतरणामुळेच झाला आहे आणि बॉम्बेदेखील याला अपवाद नाही. आगरी समाजाचे शेतकरी बांधव आणि कोळी समाजातील मासेमारी करणारे लोक या सात बेटांच्या शहराचे मूळ रहिवासी होते. या बेटांवर सगळ्यात आधी युरोपातील पोर्तुगीजांची नजर पडली आणि त्यांनी या द्वीपसमूहाला आपल्या आरमाराचे तळ आणि बंदर म्हणून विकसित केले. मात्र १८८१मध्ये जेव्हा पोर्तुगीज राजकन्येचा इंग्लंडच्या राजाशी विवाह झाला, तेव्हा हा द्वीपसमूह तिला विवाहात आंदण म्हणून देण्यात आला आणि मग इंग्लंडच्या अखत्यारीत आल्यावर बॉम्बेच्या एकंदर भौगोलिक, रहिवासीय आणि पायाभूत सुविधांमध्ये महत्त्वाचे बदल झाले. या बदलांच्या सुरू होण्यास जवळपास २०० वर्षांनी या सात बेटांना एकत्र करून एका शहराचे स्वरूप देण्यात आले. आणि मग इथे स्थलांतरित होणारे पहिले लोक हे जमिनीमार्गे आले आणि त्यात आताच्या गुजरात, गोवा आणि राजस्थान या राज्यातील लोकांचा समावेश होता. त्यानंतर भारतातील पहिल्या नागरी रेल्वे सेवेची १८५३मध्ये सुरुवात झाली आणि स्थलांतरणाचा वेग एकदम वाढला, ज्यामुळे या शहराचा चेहरामोहरा बदलण्यास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. नंतरच्या काळात उत्तर भारत, दक्षिण भारत, बंगाल, सिंध आणि अफगाणिस्तान येथून मोठ्या संख्येने स्थलांतर करून लोकांचे जथ्थे या शहरात येऊ लागले. आणि १९४०च्या सुरुवातीला सांताक्रुज विमानतळावर व्यावसायिक विमान सेवेला प्रारंभ झाला आणि मग बॉम्बे हे एक आंतरराष्ट्रीय शहर म्हणून स्थापित होण्यास सुरुवात झाली.

◆

## १६ जून ते १५ जुलै २०२५ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३० जून दरम्यान खास सवलत**

**१६ जून - डॉ. नंदकुमार उकडगावकर यांचा जन्मदिन**

'हेल मेट्स' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत १२६/-**

---

**जून महिन्यातील तिसरा रविवार - जागतिक पितृदिन**

'चिकन सूप फॉर द फादर्स सोल, भाग - १', 'चिकन सूप फॉर द फादर्स सोल, भाग - २', 'चिकन सूप फॉर द सोल इंडियन फादर्स', 'चिकन सूप फॉर द सोल इंडियन फादर्स भाग २','चिकन सूप फॉर द फादर ॲन्ड सन सोल, भाग - १', 'चिकन सूप फॉर द फादर ॲन्ड सन सोल, भाग - २','चीपर बाय दी डझन', 'वपु', 'वपु सांगे वडिलांची कीर्ती', 'पितृॠण', 'स्वामीकार', 'असा असावा बाप', 'द सिन्स ऑफ द फादर', 'लेट हर फ्लाय' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३२९०/- । सवलत किंमत २०६३/-**

---

**१७ जून - संत कबीर यांचा जन्मदिन**

'भक्तीत भिजला कबीर', 'म्हणे कबीर दिवाणा', 'मी धार्मिकता शिकवतो, धर्म नाही!', 'साद घालतो कबीर', 'ऐका संतांनो', 'प्रेमरस... कबीरांचा!', 'धर्म कबिरांच्या मनातला', 'मृत्यू अमृताचे द्वार' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १६४५/- । सवलत किंमत १०४९/-**

---

**१७ जून - प्रा. शशिकांत कुगांवकर यांचा जन्मदिन**

'नभांतमणी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४२०/- । सवलत किंमत २९४/-**

---

**१९ जून - बेबी हालदार यांचा जन्मदिन**

'आलो-आंधारि' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९९/-**

**२० जून - रॉबर्ट क्रेस यांचा जन्मदिन**

‘द वॉचमन’, ‘द वॉन्टेड’, ‘द मंकीज रेनकोट’ या पुस्तकांवर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ११९०/- । सवलत किंमत ७१०/-**

**२१ जून - ग्रेगरी डेव्हिड रॉबर्ट्स यांचा जन्मदिन**

‘शांताराम’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ९९५/- । सवलत किंमत ६९७/-**

**२१ जून - स्वाती चांदोरकर यांचा जन्मदिन**

‘अनाहत’, ‘आणि विक्रमादित्य हरला!’, ‘सेलिब्रेशन’, ‘एक पायरी वर’, ‘फॉरवर्ड अँड डिलिट’, ‘गोल गोल राणी’, ‘हिज डे’, ‘काळाकभिन्न’, ‘पवित्रम्’, ‘शेष’, ‘उत्खनन’, ‘वपु’, ‘युथनेशिया’, ‘तोड’, ‘सापशिडी’, ‘अथक’, ‘ब्लॉटिंग पेपर’
**संचाची मूळ किंमत ३५१०/- । सवलत किंमत २२८२/-**

**२१ जून - बहार दत्त यांचा जन्मदिन**

‘हरित युद्धे’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७५/-**

**२१ जून - जागतिक संगीत दिन**

‘मायकल जॅक्सन : एक जादू आणि बेधुंदी!’, ‘मंद्र’, ‘अभोगी’, ‘अनाहत’, ‘गंधर्वगाथा’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २३७०/- । सवलत किंमत १५४०/-**

**२१ जून - जागतिक योग दिन**

**संच १** - ‘आपण आपले ताणतणाव - एक चिंतन’, ‘आरोग्यासाठी योग’, ‘पाठदुखी घालविण्यासाठी योगसाधना’, ‘फिट फॉर ५०+ फॉर विमेन’, ‘ची रनिंग’, ‘ध्यानसूत्र’, ‘‘स’ सुखाचा!’, ‘चिंता सोडा सुखाने जगा’, ‘पाणी : एक अद्भुत उपचारपद्धती’, ‘धन्वंतरी घरोघरी’, ‘हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ई.ई.सी.पी. तंत्र’, या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २२९०/- । सवलत किंमत १४११/-**

**संच २ -** ‘निरामय यशासाठी ध्यान’, ‘द माइंड जिम’, ‘२० मिनिटे तंदुरुस्तीसाठी’, ‘स्थूलतेला करा टाटा’, ‘स्वत:चा शोध’, ‘अर्थाच्या शोधात’, ‘मनावर विजय’, ‘एकच पेला शिवाम्बूचा’, ‘चला जाणून घेऊ या! तंदुरुस्ती’, ‘चला जाणून घेऊ या! आयुर्वेदाद्वारे आहार आणि आरोग्य’, ‘पीस, लव्ह ॲन्ड हीलिंग’ या

पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १२५०/- । सवलत किंमत १४४४/-**

**संच ३ -** 'चिंतामुक्त जीवन', 'कार्यमग्न, व्यस्त लोकांसाठी योगसाधना', 'सर्व वयोगटांसाठी योगसाधना आणि ध्यानधारणा', 'फिट फॉर ५०+ फॉर मेन', 'हसत-खेळत ध्यानधारणा', 'प्रिझनर्स ऑफ अवर थॉट्स', 'सुंदर मन', 'अन्नपुराण–आयुर्वेदिक, आधुनिक', 'लव्ह, मेडिसिन आणि मिरॅकल्स', 'चला जाणून घेऊ या! योगविद्या', 'सौंदर्य आणि तारुण्य टिकविण्यासाठी योगसाधना' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २४६५/- । सवलत किंमत १६२२/-**

---

**२२ जून - डॅन ब्राऊन यांचा जन्मदिन**

'एन्जल्स अ‍ॅण्ड डेमन्स', 'डिसेप्शन पॉईंट', 'डिजिटल फॉर्ट्रेस', 'द दा विंची कोड', 'द लॉस्ट सिम्बॉल', 'इन्फर्नो', 'ओरिजिन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३८७०/- । सवलत किंमत २३४४/-**

---

**२२ जून - महादेव मोरे यांचा जन्मदिन**

महादेव मोरे यांच्या बावीस पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४८३५/- । सवलत किंमत २९३३/-**

---

**२२ जून - विकास स्वरूप यांचा जन्मदिन**

'सहा संशयित', 'स्लमडॉग मिलेनिअर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०४५/- । सवलत किंमत ७३२/-**

---

**२४ जून - बाबू गंजेवार यांचा जन्मदिन**

'चाणाक्ष' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २७७/-**

---

**२५ जून - सुधा रिसबूड यांचा जन्मदिन**

'अंतरिक्षाचा वेध', 'गार्डिअन', 'कल्पित-अकल्पित', 'रिचर्ड फाईनमन : एक हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७९०/- । सवलत किंमत ५०५/-**

---

**२५ जून - शशी पाटील यांचा जन्मदिन**

'एकच पेला शिवाम्बूचा' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत १०९/-**

**२५ जून - जोना लेहरर यांचा जन्मदिन**

‘प्रतिभेचा इंद्रधनू’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७५/-**

**२६ जून - छत्रपती शाहू महाराज जयंती**

‘छत्रपती राजर्षी शाहू महाराज’, ‘राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा’, ‘राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे’, ‘राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे’, ‘राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे’, ‘राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे’, ‘राजर्षी शाहू छत्रपती : एक अभ्यास’, ‘समाजक्रांतिकारक राजर्षी शाहू छत्रपती’, ‘शाहू महाराजांच्या आठवणी’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २१४५/- । सवलत किंमत १३९२/-**

**२६ जून - पर्ल एस. बक यांचा जन्मदिन**

‘काळी’, ‘पिढी दर पिढी’, ‘द मदर’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०२०/- । सवलत किंमत ७०४/-**

**२७ जून - राम प्रधान यांचा जन्मदिन**

‘पहिली फेरी?(१९६५ भारत-पाक युद्ध)’, ‘वादळ माथा ते १९६५ भारत-पाक युद्ध’, ‘माझी वाटचाल : मेटकॉफ हाउस ते राजभवन’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०४५/- । सवलत किंमत ६४९/-**

**२७ जून - ई. आर. ब्रेथवेट यांचा जन्मदिन**

‘टू सर, विथ लव्ह’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत १९४/-**

**३० जून - दिनकर जोषी यांचा जन्मदिन**

‘अ-मृत पंथाचा यात्री’, ‘अंकरहित शून्याची बेरीज’, ‘अयोध्येचा रावण आणि लंकेचा राम’, ‘कालपुरुष’, ‘महाभारतातील मातृवंदना’, ‘महाभारतातील पितृवंदना’, ‘सुरम्य सूर्यास्त’, ‘रामायणातील पात्रवंदना’, ‘इथे कुणी नाही’, ‘महामानव सरदार पटेल’, ‘कृष्णं वन्दे जगद्गुरुम्’, ‘परतुनि ये घनश्याम’, ‘अमृतयात्रा’, ‘द्वारकेचा सूर्यास्त’, ‘भारतीय संस्कृतीचे सर्जक’, ‘प्रश्नप्रदेशापलीकडे’, ‘प्रकाशाची

सावली’, ‘प्रतिनायक’, ‘चक्र ते चरखा’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ४८००/- । सवलत किंमत ३०००/-**

**३० जून - करण बजाज यांचा जन्मदिन**

‘कीप ऑफ द ग्रास’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९९/-**

**खालील संचांवर १ ते १५ जुलै दरम्यान खास सवलत**

**१ जुलै - जागतिक विनोद दिन**

संच १ - ‘कसं बोललात! भाग १ ते ७’, ‘हसाल तर वाचाल’, ‘फुकट’, ‘गोलमाल’, ‘हेलमेट्स’, ‘झांझिबारी मसाला’, ‘तिंगाड’, ‘कांद्याचा वांदा’, ‘पु.ल. एक आनंदयात्रा’, ‘पुणं एक साठवण’, ‘गोष्टींचं एटीएम’, ‘खुमासदार अत्रे’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २६६५/- । सवलत किंमत १७३२/-**
संच २ - ‘गुदगुल्या’, ‘इल्लम’, ‘वावरी शेंग’, ‘खुशखरेदी’ ‘जुगलबंदी’, ‘ताजमहालमध्ये सरपंच’, ‘धिंड’, ‘जावईबापूंच्या गोष्टी’, ‘हुबेहूब’, ‘गुदगुल्या’, ‘भुताचा जन्म’, ‘हसणावळ’, ‘माझ्या बापाची पेंड’
**संचाची मूळ किंमत २०३०/- । सवलत किंमत १३१९/-**

**१ जुलै - इव्हा हॉफमन यांचा जन्मदिन**

‘कालाय नम:’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ११२/-**

**२ जुलै - जागतिक UFO दिन**

‘पृथ्वीवर माणूस उपराच!’, ‘देव? छे! परग्रहावरील अंतराळवीर!’, ‘अंतराळवीर सुनीता विल्यम्स’, ‘स्वप्नाकडून सत्याकडे...(कल्पना चावलाची कहाणी)’, ‘अंतराळ स्पर्धा’, ‘अंतरिक्षाचा वेध’, ‘जॉर्ज ॲन्ड द ब्लू मून’, ‘जॉर्ज ॲन्ड द शिप ऑफ टाईम’, ‘जॉर्ज ॲन्ड द अनब्रेकेबल कोड’, ‘जॉर्ज ॲन्ड द बिग बँग, ‘जॉर्जेस कॉस्मिक ट्रेझर हंट’, ‘जॉर्जेस सिक्रेट की टू द युनिव्हर्स’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३८१०/- । सवलत किंमत २३०४/-**

**२ जुलै - पीटर कुझनिक यांचा जन्मदिन**

‘अमेरिकेचा न सांगितला गेलेला संक्षिप्त इतिहास’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३४७/-**

**४ जुलै - नेथानिएल हॉथॉर्न यांचा जन्मदिन**

‘प्रायश्चित्त’, ‘शापित वास्तू’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ४५५/-**

**४ जुलै - डॉ. अरविंद कुलकर्णी यांचा जन्मदिन**

‘उपयोजित समीक्षा : लक्षणे आणि पडताळणी’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ११२/-**

**४ जुलै - व्हेरा गिसिंग यांचा जन्मदिन**

‘आठवणींचे मोती’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३६०/- । सवलत किंमत २५२/-**

**४ जुलै - नीरज कुमार यांचा जन्मदिन**

‘खाकी फाइल्स’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७५/-**

**४ जुलै - जीन सॅसन यांचा जन्मदिन**

‘ग्रोईंग अप बिन लादेन’, ‘मयादा - इराकची कन्या’, ‘युवराज्ञी’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०६५/- । सवलत किंमत ६११/-**

**५ जुलै - वीर संघवी यांचा जन्मदिन**

‘नवभारताचे शिल्पकार’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १४०/- । सवलत किंमत ९८/-**

**६ जुलै - रेखा बैजल यांचा जन्मदिन**

‘अज्ञेय’, ‘प्रस्थान’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत १६९/-**

**७ जुलै - परमपूज्य दलाई लामा यांचा जन्मदिन**

‘करुणेचे बीज’, ‘परमसुखाची पर्वणी’, ‘धर्मांमधील बंधुत्वाच्या मार्गावर’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७३०/- । सवलत किंमत ५१५/-**

**१० जुलै - ख्रिस टर्नी यांचा जन्मदिन**

‘१९१२ : अंटार्क्टिकाच्या शोधात’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत ३१५/-**

---

**११ जुलै - रिमल चंगेडे यांचा जन्मदिन**

‘आजचा मेनू’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १४६/-**

---

**११ जुलै - झुंपा लाहिरी यांचा जन्मदिन**

‘द नेमसेक’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २७०/- । सवलत किंमत १४९/-**

---

**११ जुलै - जेन गार्डम यांचा जन्मदिन**

‘द मॅन इन द वुडन हॅट’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २०९/-**

---

**१२ जुलै - जागतिक मलाला दिन**

‘मी मलाला’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-**

---

**१२ जुलै - मनोहर माळगांवकर यांचा जन्मदिन**

‘इथे थबकली गंगामाई’, ‘कान्होजी आंग्रे’, ‘दि प्रिन्सेस’, ‘वादळवारा’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १८५९/- । सवलत किंमत १३९४/-**

---

**१३ जुलै - बाजीप्रभू बलिदान दिन**

‘पावनखिंड’, ‘श्रीमान योगी’, ‘महासम्राट-झंझावात’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १६७०/- । सवलत किंमत १२५२/-**

---

**१५ जुलै - अनंतराव खरात यांचा जन्मदिन**

‘शर्यती-स्पर्धा-खेळ’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**

**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**

मेहता पब्लिशिंग हाऊस आयोजित

बालवाचकांसाठी **उन्हाळी सुटीतील** मजेशीर उपक्रम...

# गोष्टींची सुट्टी



**RNI. No. MAHMAR/2000/02739**
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/06/2025 Posting Date : 11/06/2025

## आवर्जून वाचावं
















**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन - (०२०) २४४७६९२४

प्रति,